मुंबई विद्यापीठ

डॉ. मोहन ना. आमृळे
संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण
**Email Id: sports.mudept@gmail.com**
**Website: www.mu.ac.in**

विद्यापीठ क्रीडा संकुल, मरिन लाईन्स,
मुंबई – ४०० ०२०.
दुरध्वनी क्र.: ०२२ २२८२६०२७/
२२८१७६९८

विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ

परिपत्रक – क्र.क्रीडा/०१५ /२०२४ दिनांक: २९/०५/२०२४

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक,
मुंबई विद्यापीठातील सर्व संलग्न महाविद्यालये व
मान्यताप्राप्त संस्था.

विषय:– मुंबई विद्यापीठ संलग्नित वरिष्ठ महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालकांचे तृतीय (तिसरे) चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीर शैक्षणिक वर्ष २०२४–२५ बाबत.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयांन्वये आपणांस या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, आगामी शैक्षणिक वर्ष २०२४–२५ करीता मुंबई विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळातर्फे तयार करण्यात आलेल्या विभागीय आंतर महाविद्यालयीन स्पर्धांच्या व आंतर विभागीय स्पर्धा आयोजनासंदर्भात विद्यापीठ नियमावली, विभाग निश्चिती, विभागीय रचना व कार्यपद्धतीच्या प्रणालीची अंमलबजावणी होणेसाठी व याविषयी विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयाच्या क्रीडा प्रतिनिधी समवेत चर्चा करुन तसेच या कार्यवाहीमधील अभिप्राय व त्यांच्या शंकाचे निसरण करुन स्पर्धा ह्या विभागीय स्तरांवर घेणे, जेणेकरुन विद्यार्थी/खेळाडूंना न्यायिक/स्पर्धात्मक वातावरण तयार होऊन नव्या जोमाने खेळाडूंचा सहभाग वाढला आहे. यामध्ये काही अडचणी/त्रुटी आल्या आहेत त्यावर सविस्तर चर्चा/विनिमये घेऊन विद्यापीठीय संघ हा पश्चिम विभागीय/आंतर विभागीय/अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धा २०२४–२५ करीता सहभागास सुसज्ज/तयार होणेकरीता क्रीडा व शा. शिक्षण मंडळाच्या विद्यमाने व स्टर्लिंग कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नेरुळ या महाविद्यालयाच्या सौजन्याने शारीरिक शिक्षण संचालकांचे चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीर हे सोमवार दि. १७ जून, २०२४ ते २० जून, २०२४ या कालावधीत शिबीर स्थळ – ड्रीम रिसोर्ट लोणावळा, डॉन बॉस्को शाळेजवळ, तुंगार्ली, लोणावळा – ४१० ५०२. **(Dream Resort Lonavala, Near Don Bosco School, Tungarli, Lonavala – 410 502)** येथे आयोजित करण्यात येणार आहे.

या चर्चासत्रात मुंबई विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील व मान्यताप्राप्त संस्थामधील क्रीडा प्रतिनिधींना खाली नमूद केलेल्या क्रमप्राप्तीप्रमाणेच उपस्थित राहणे अनिवार्य राहिल.

अ) महाविद्यालयाचे मान्यताप्राप्त संचालक, शारीरिक शिक्षण व क्रीडा,
किंवा

–– पान क्र. २ ––

डॉ. मोहन ना. आमृळे
संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण
**Email Id:** sports.mudept@gmail.com
**Website:** www.mu.ac.in

विद्यापीठ क्रीडा संकुल, मरिन लाईन्स,
मुंबई – ४०० ०२०.
दुरध्वनी क्र.: ०२२ २२८२६०२७/
२२८१७६९८


## विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ



ब) कनिष्ठ महाविद्यालयाचे मान्यताप्राप्त क्रीडा शिक्षक (**M.P.Ed.**) पदवी प्राप्त अथवा वरिष्ठ महाविद्यालयाचे क्रीडा शिक्षक (**M.P.Ed.**) पदवी प्राप्त,

किंवा

क) महाविद्यालयाचे पुर्ण वेळ इतर विषयांचे शिक्षक हे क्रीडा प्रमुख म्हणून काम करीत आहे.

वरील व्यतिरीक्त इतर प्रतिनिधींना शिबीरात सहभागी करुन घेण्यात येणार नाही. तसेच चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीराच्या पुर्व नोंदणीकरीता खालील प्रमाणे गुगल लिंक फॉर्म/Google link form उपलब्ध करण्यात आलेला आहे. आपण क्रीडा प्रतिनिधी/शिबीरार्थींनी याचा वापर करावा.

https://forms.gle/sPvhkDXN1VPBsNhz8

या क्रीडा चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीराबाबतची माहिती आपल्या महाविद्यालयाच्या प्रतिनिधींना खालील सुचना निर्देशित करणे, हि विनंती.

१) महाविद्यालयीन क्रीडा प्रतिनिधींना/शिबीरार्थींना चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीरास उपस्थित राहण्याबद्दल संबंधितांचा दैनंदिन भत्ता, प्रवास खर्च व इतर अनुषंगिक खर्च हा संबंधित महाविद्यालयास करावा लागेल. याबाबतची पूर्वपरवानगी विद्यापीठ प्रशासनाकडून मिळालेली आहे.

२) चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीराचा कालावधी एकुण चार दिवसांचा असेल. (कालावधी – सोमवार दि. १७ जून, २०२४ ते गुरुवार २० जून, २०२४). प्रत्येक शिबीरार्थीस नोंदणी शुल्क रु. ८००/– (आठशे रुपये फक्त) प्रतिदिनी याप्रमाणे एकुण रु. ३,२००/– (तीन हजार दोनशे रुपये फक्त) व अनामत रक्कम म्हणून रु. २,०००/– (दोन हजार रुपये फक्त) रक्कम सहभागी होणाऱ्या प्रतिनिधींनी बुधवार दि. दि. १७ जून, २०२४ रोजी नावनोंदणी करतेवेळी चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीर आयोजन करणाऱ्या महाविद्यालयाकडे रोख स्वरुपात जमा करणे क्रमप्राप्त राहिल. सदर दोन्ही रक्कमेची रितसर पावती सहभागी क्रीडा प्रतिनिधींना देण्यात येईल. तसेच गुरुवार दि. २० जून, २०२४ रोजी रु. २,०००/– (दोन हजार रुपये फक्त) अनामत रक्कमेची पावती सादर केल्यानंतरच क्रीडा प्रतिनिधींना रु. २,०००/– चा परतावा करण्यात येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

३) चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीरास उपस्थित राहणाऱ्या क्रीडा प्रतिनिधीची निवास व्यवस्था, नाश्ता, चहापान, भोजन व्यवस्था व आवश्यक स्टेशनरी संयोजक महाविद्यालयाकडून देण्यात/करण्यात येईल.

मुंबई विद्यापीठ

डॉ. मोहन ना. आमृळे
संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण
**Email Id:** sports.mudept@gmail.com
**Website:** www.mu.ac.in

विद्यापीठ क्रीडा संकुल, मरिन लाईन्स,
मुंबई – ४०० ०२०.
दुरध्वनी क्र.: ०२२ २२८२६०२७/
२२८१७६९८

विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ



४) **सोमवार दि. १७ जून, २०२४** रोजी चर्चासत्राच्या ठिकाणी दुपारी १२.०० वाजेपर्यंत सर्व क्रीडा प्रतिनिधींनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. प्रत्येक सहभागी प्रतिनिधी/शिबीरार्थीजवळ नाव नोंदणी करताना आपण ज्या महाविद्यालयात कार्यरत आहात व शिबीरास उपस्थित राहण्याबाबतचे **मा. प्राचार्यांचे संमतीपत्र सादर करणे बंधनकारक राहिल. अन्यथा संबंधित प्रतिनिधी/शिबीरार्थी यांना उपरोक्त चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीरास सहभाग नोंदविता येणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.**

सविस्तर टिप:–

**ड्रीम रिसोर्ट लोणावळा हे लोणावळा रेल्वे स्टेशनहून २ किमी. च्या अंतरावर आहे. या स्थानिक प्रवासासाठी ऑटोरिक्शा ही (Direct) व (Sharing) उपलब्ध असेल यांची नोंद असावी.**

५) **या चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीराच्या कालावधीत कोणत्याही क्रीडा प्रतिनिधी/शिबीरार्थींना खाजगी कामाकरीता अन्य ठिकाणी जाण्याची कोणत्याही प्रकारची सवलत दिली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.** सोमवार दि. १७ जून, २०२४ ते गुरुवार २० जून, २०२४)या चार दिवसांच्या कालावधीत होणाऱ्या शिबीराच्या प्रत्येक कार्यक्रमास उपस्थित राहणे अनिवार्य असेल तद्नंतरच संबंधित शिबीरार्थीस शिबीरास उपस्थितीबाबतचे **प्रमाणपत्र व कार्यमुक्ती आदेश (Reliving Order)** देण्यात येईल.

६) चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीर **उद्घाटन व समारोपदिनी** सहभागी क्रीडा प्रतिनिधी/शिबीरार्थीनी पांढरा गणवेश (पोशाख) असणे आवश्यक आहे, नसल्यास किमान पांढरा शर्ट/टि–शर्ट आवश्यक राहिल.

७) **या चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीराकरीता मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे जिल्हा व कोकण विभागीय सचिवांचे मार्गदर्शन होणार असून व इतर मान्यवरांचे विविध विषयांवर व्याख्याने व प्रात्याक्षिके व योगासने होणार आहेत.**

८) **सदर चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीरामध्ये मा. डॉ. रुपेश थोपटे यांचे मानवी शारीरिक हालचाली व शारीरिक ताणाच्या व्यायामाचे विविध प्रात्याक्षिके होणार असल्याने** सहभागी क्रीडा प्रतिनिधी/शिबीरार्थीनी (पुरुष व महिला) एक कापडी ओढणी सोबत ठेवावी.

शिबीरार्थींना महत्त्वाच्या सुचना:–

| | |
|---|---|
| १. | शिबीरार्थीनी शिबीरास येताना **मौल्यवान वस्तू अथवा रोख रक्कम** ही स्वत: च्या जबाबदारीवर आणावी. |
| २. | निवासाची व्यवस्थेत क्रीडा प्रतिनिधींना प्रत्येकी रुममध्ये (४) चार व्यक्ती अशाप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात येईल. |
| ३. | सोमवार दि. १७ जून, २०२४ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंतच्या कालावधीत ड्रीम रिसोर्ट लोणावळा, डॉन बॉस्को शाळेजवळ, तुंगार्ली, लोणावळा – ४१० ५०२ येथे स्वागत व नोंदणीकक्ष करीता उपस्थित राहावे |
| ४. | प्रत्येक सहभागी क्रीडा प्रतिनिधींनी आपल्या महाविद्यालयांचे ओळखपत्र सादर करणे बंधनकारक राहिल. |

—— पान क्र. ४ ——

मुंबई विद्यापीठ

डॉ. मोहन ना. आमृळे
संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण
**Email Id:** sports.mudept@gmail.com
**Website:** www.mu.ac.in

विद्यापीठ क्रीडा संकुल, मरिन लाईन्स,
मुंबई – ४०० ०२०.
दुरध्वनी क्र.: ०२२ २२८२६०२७/
२२८१७६९८

विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ





| | |
|---|---|
| ५. | आयोजक महाविद्यालयाकडून क्रीडा प्रतिनिधी/शिबीरार्थींना निवासाकरीता फक्त बेड व गादी देण्यात येणार आहे. आपण सोबत येताना वैयक्तिक बेडशिट, चादर व इतर तत्सम वस्तू आणाव्यात. |
| ६. | सर्व सहभागी क्रीडा प्रतिनिधींनी योगासनाच्या व्यायाम प्रकार करण्यासाठी आपल्या सोबत ट्रॅकसुट, टि–शर्ट, स्पोटर्स शुज असणे आवश्यक आहे. |
| ७. | शिबीरास उपस्थितीकरीता खालील कागदपत्रे आवश्यक असतील याची नोंद असावी/सोबत आणावेत.<br>१) विद्यापीठाने तयार केलेली क्रीडा स्पर्धाची विद्यापीठीय रचना व नियमावलीची (आवृत्ती क्र.२) ची प्रत,<br>२) क्रीडा प्रतिनिधीनी नोंदणी अर्जासोबत (Registration Form) आपल्या महाविद्यालयाकडून / महाविद्यालयाच्या प्राचार्यामार्फत शिबीरास उपस्थित राहण्याबाबतचे कार्यमुक्ती पत्र/संमतीपत्र (Relieving Letter) सोबत आणावे.<br><br>– प्रत सोबत जोडली आहे – १) क्रीडा स्पर्धाची विद्यापीठीय रचना व नियमावलीची (आवृत्ती क्र.२)<br>२) नोंदणी अर्ज (Registration Form) |
| | |

कृपया सदरचे पत्र आपल्या महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक, क्रीडा प्रमुख व क्रीडा प्रतिनिधींच्या निदर्शनास आणून या शिबीरातील क्रीडा क्षेत्रातील आधुनिक बाबीं आत्मसात करण्यासाठी अवश्य उपस्थित राहण्यास सांगावे.

धन्यवाद! सहकार्याचे अपेक्षेत.

आपला,

सही/– (दि. २९/०५/२०२४)
डॉ. मोहन ना. आमृळे
संचालक,
क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ



**मुंबई विद्यापीठ**

# मुंबई विद्यापीठ

# क्रीडा मंडळ

---

# नियम पुस्तिका

(आंतरमहाविद्यालय, आंतर विभागीय व

आंतर विद्यापीठीय स्पर्धेकरीता)

❖ आवृत्ती क्र.२ –

१) क्रीडा व शा. शिक्षण मंडळाच्या दि. २४.०८.२०२३ रोजी संपन्न झालेल्या आभासी सभेच्या अन्वये..

डॉ. मोहन नामदेव आमृळे
संचालक,
क्रीडा व शारीरिक शिक्षण
मुंबई विद्यापीठ

# प्रकरण एक – प्रारंभिक

मुंबई विद्यापीठाच्या कबड्डी (मुले), खो–खो (मुले), व्हॉलीबॉल (मुले), बुध्दिबळ (मुले), क्रिकेट (मुले) या क्रीडा प्रकारांच्या आंतरमहाविद्यालयीन व आंतर विभागीय स्पर्धा होत होत्या. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेतील प्राविण्य प्राप्त संघ आंतर विभागीय स्पर्धेत सहभागी होत असे. तसेच प्राविण्य प्राप्त नसलेल्या संघातील उत्तम खेळाडूंचीनिवड विद्यापीठ संघामध्ये होत नव्हती.

त्याचबरोबर वरील खेळाव्यतिरीक्त इतर सर्व खेळांनी स्पर्धा ह्या मुंबई विद्यापीठाच्या कक्षेतील सर्व संलग्नित महाविद्यालयांच्या एकत्रित स्पर्धा होत असतात. त्यामुळेसंघाचे/खेळाडूंचे प्राविण्य हे अति कमी ते अति उच्च असे होत असत. तथापि, विद्यापीठाचा अंतिम संघ निवडण्यासाठीसंघातील प्राविण्यपुर्ण खेळाडूंची निवड हि सहभागी खेळाडू स्पर्धकांमधून करणे हे अडचणीचे होत होते. तसेच स्पर्धाचे आयोजन हे विविध जिल्ह्यांमध्ये होत असल्याने विविध महाविद्यालयातील सहभागी संघाचे स्पर्धक/खेळाडूंना सहभाग नोंदविण्याकरीता प्रवास हा अतिशय लांब पल्ल्यांचा असल्यामुळे स्पर्धेत संघ सहभागी होण्याचे प्रमाण कमी होते

या सर्व अडचणींचा उपाय म्हणून मा. कुलगुरु, मुंबई विद्यापीठ यांनी महाराष्ट्र राज्य सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ नुसार विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांमध्ये क्रीडा संस्कृतीस चालना देणे, सर्व सहभागी खेळाडूंना न्याय देणे, स्थानिक क्रीडा स्पर्धाचे आयोजन करणे, प्रादेशिक व राष्ट्रीय मंडळाच्या संयुक्त विद्यमानाने क्रीडा कार्यक्रमांमध्ये समन्वय साधणे, प्रशिक्षण आयोजित करणे या सर्व विषयांची अंमलबजावणी करण्याकरीता पुढीलप्रमाणे मुंबई विद्यापीठ क्रीडा मंडळाने नियमावली तयार केली आहे.

# प्रकरण दोन–व्याख्या

व्याख्या :

**१) विभागीय क्रीडा समिती :–**

विद्यापीठ क्रीडी मंडळाने ठरवून दिलेल्या विभागाप्रमाणे सर्व मुंबई विद्यापीठाशीसंलग्नीत असलेल्या महाविद्यालयाचे प्राचार्य/विद्यापीठाचे पदवीधर विभागप्रमुख, मान्यताप्राप्त संचालक, शारीरिक शिक्षण व क्रीडा अथवा प्राचार्याचे प्रतिनिधीहे विभागाच्या क्रीडा समितीचे सर्व  सदस्य असतील. या सर्व सदस्यांची मिळून विभागीय क्रीडा समिती होय.

**२) विभागीय क्रीडा समितीचे अध्यक्ष :–**

जे महाविद्यालय स्थानिक विभागाचे यजमानपद भूषवित आहे त्या महाविद्यालयाचे प्राचार्य हे विभागीय क्रीडा समितीचे अध्यक्ष असे संबोधण्यात येईल. क्रीडा समितीच्या अध्यक्षपदाच्या निवडीकरीता महाविद्यालयाचे प्राचार्य/मान्यताप्राप्त संस्थांचे प्रमुख/पदव्युत्तर विद्यापीठ जिमखाना अध्यक्षांपैकी व्यक्तीस फक्त पात्र समजण्यात येईल.

**३) विभागीय कार्यकारी समिती :–**

विभागीय क्रीडा समितीचा सर्व सदस्यांना प्रत्येकी वेळी एकत्र करुन निर्णय घेणे शक्य नसल्यामुळे विभागाचा कारभार सुरळीत पाडण्यासाठी व त्वरीत निर्णय घेण्यासाठी सर्व सदस्यांमधून समिती स्थापण्यात येईल त्यास विभागीय कार्यकारी समिती असे संबोधण्यात येईल.

**४) विभागीय क्रीडा समितीचे कार्याध्यक्ष :–**

ज्या महाविद्यालयाचे प्राचार्य हे स्थानिक विभागीय क्रीडा समितीचे यजमान महाविद्यालयास सहकार्य करण्यास आहेत असे प्राचार्य हे विभागीय क्रीडा समितीचे कार्याध्यक्ष म्हणून संबोधण्यात येणार आहेत.

**५) विभागीय क्रीडा समितीचे सचिवः–**

जे महाविद्यालय यजमानपद भुषवित आहेत त्या महाविद्यालयाचे मा. संचालक, शारीरिक शिक्षण अथवापूर्णवेळ अधिकृत प्राध्यापक हे विभागीय क्रीडा समितीचे सचिव संबोधण्यात येईल.

**६) आंतरमहाविद्यालयीन सचिव :–**

ज्या महाविद्यालयाचे प्राचार्य कार्याध्यक्ष म्हणून काम करीत आहेत त्या महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक हे आंतरमहाविद्यालयीन सचिव म्हणून संबोधण्यात येईल.

**७) आंतरमहाविद्यालयीन सहसचिव :–**

विभागाच्या आंतरमहाविद्यालयीन सचिवांस मदत म्हणून कार्य करणाऱ्या शा. शिक्षण संचालकास आंतरमहाविद्यालयीन सहसचिव असे संबोधण्यात येईल.

**८) स्पर्धा आयोजक :–**

आंतरमहाविद्यालयीन आंतर विभागीय स्पर्धांची जबाबदारी ज्या महाविद्यालयाने घेतली आहे त्या महाविद्यालयाचे क्रीडा शिक्षक हे स्पर्धा आयोजक असे संबोधण्यात येईल.

**९) आंतर विभागीय स्पर्धा :–**

मुंबई विद्यापीठाने ठरवून दिलेल्या चार विभागांच्या एकत्र स्पर्धा होतात त्यास स्पर्धेस आंतर विभागीय स्पर्धा असे संबोधण्यात येईल.

**१०) विभागीय स्पर्धा/आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा :–**

स्थानिक विभागाच्या आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेस विभागीय स्पर्धा अथवा आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा असे संबोधण्यात येईल.

**११) सर्वसाधारण सभा :–**

विभागीय क्रीडा समितीच्या सर्व सदस्यांना ज्या सभेचे निमंत्रण दिले जाते त्यास सर्वसाधारण सभा ही वर्षातून किमान दोन सभा संबोधण्यात येते.

**१२) तज्ञ व्यक्ती :–**

ज्या महाविद्यालयांचे पुर्णवेळ संचालक, शारीरिक शिक्षण हे पद भरले नाही अशा महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी शिफारस केलेल्या पदवी प्राप्त (M.P.Ed.) शिक्षकांना अथवा संघटनेच्या पदाधिकारी व माजी आंतर विद्यापीठ खेळाडू यांना तज्ञ व्यक्ती असे संबोधण्यात येईल.

..............................................................................

# प्रकरण – तीन

## (अ) मुंबई विद्यापीठ कक्षेतील विभागीय क्रीडा समिती

१) विभागीय क्रीडा समितीचे विभाजनः–

मुंबई विद्यापीठाच्या विभागीय/आंतर विभागीय स्पर्धाकरीता संलग्नित महाविद्यालयाचेसहभाग खालीलप्रमाणे चार विभागांमध्ये समाविष्ठ करण्यात येईलः–

| | | |
|---|---|---|
| १) | विभाग–I | मुंबई शहर जिल्हाधिकारी यांच्या कक्षेत येणारी सर्व महाविद्यालये, मध्य उपनगर रेल्वे लाईनच्या पुर्वेकडील मुंबई उपनगरांमधील सर्व महाविद्यालये तसेच रायगड जिल्ह्यातील पनवेल, उरण व खालापूर तालुक्यांतील सर्व महाविद्यालये. |
| २) | विभाग –II | मुंबई उपनगर जिल्हाधिकारी यांच्या कक्षेत (मध्य उपनगर रेल्वे लाईनच्या पुर्वेकडील मुंबई उपनगरांमधील सर्व महाविद्यालये वगळून) येणारी सर्व महाविद्यालये तसेच पालघर जिल्हयांतील वसई, पालघर, डहाणू व तलासरी व ठाणे जिल्ह्यांतील मिरा रोड, भाईंदर या तालुकांच्या कक्षेत येणारी सर्व महाविद्यालये. |
| ३) | विभाग –III | ठाणे जिल्हाधिकारी यांच्या कक्षेत येणारी सर्व महाविद्यालये तसेच पालघर जिल्हयांतील जव्हार, वाडा, मोखाडा व विक्रमगड या तालुकांच्या कक्षेत येणारी सर्व महाविद्यालये व रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील सर्व महाविद्यालये. |
| ४) | विभाग –IV | रत्नागिरी जिल्हा, सिंधुदूर्ग जिल्हा व रायगड जिल्हातील (पनवेल, उरण, खालापूर व कर्जत तालुक्यांमधील महाविद्यालये वगळून) जिल्हाधिकारी यांच्या कक्षेत येणारी सर्व महाविद्यालये. |

# मुंबई विद्यापीठ क्रीडा मंडळ स्पर्धा रचना

| (विभाग –I) | (विभाग –II) | (विभाग –III) | (विभाग –IV) |
|---|---|---|---|
| ↓ | ↓ | ↓ | ↓ |
| विभागीय क्रीडा समिती –I (मुंबई शहर जिल्हाधिकारी यांच्या कक्षेत येणारी सर्व महाविद्यालये, मध्य उपनगर रेल्वे लाईनच्या पुर्वेकडील मुंबई उपनगरांमधील सर्व महाविद्यालये तसेच रायगड जिल्ह्यातील पनवेल, उरण व खालापूर तालुक्यांतील सर्व महाविद्यालये) | विभागीय क्रीडा समिती –II (मुंबई उपनगर जिल्हाधिकारी यांच्या कक्षेत (मध्य उपनगर रेल्वे लाईनच्या पुर्वेकडील मुंबई उपनगरांमधील सर्व महाविद्यालये वगळून) येणारी सर्व महाविद्यालये तसेच पालघर जिल्हयांतील वसई, पालघर, डहाणू व तलासरी व ठाणे जिल्ह्यांतील मिरा रोड, भाईंदर या तालुकांच्या कक्षेत येणारी सर्व महाविद्यालये) | विभागीय क्रीडा समिती –III (ठाणे जिल्हाधिकारी यांच्या कक्षेत येणारी सर्व महाविद्यालये तसेच पालघर जिल्हयांतील जव्हार, वाडा, मोखाडा व विक्रमगड या तालुकांच्या कक्षेत येणारी सर्व महाविद्यालये व रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील सर्व महाविद्यालये) | विभागीय क्रीडा समिती –IV (रत्नागिरी जिल्हा, सिंधुदूर्ग जिल्हा व रायगड जिल्हातील (पनवेल, उरण, खालापूर व कर्जत तालुक्यांमधील महाविद्यालये वगळून) जिल्हाधिकारी यांच्या कक्षेत येणारी सर्व महाविद्यालये) |
| स्थानिक आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा (बाद पद्धतीने) | स्थानिक आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा (बाद पद्धतीने) | स्थानिक आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा (बाद पद्धतीने) | स्थानिक आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा (बाद पद्धतीने) |
| वरील स्पर्धेतून सर्व संघामधून संघ निवडणे | वरील स्पर्धेतून सर्व संघामधून संघ निवडणे | वरील स्पर्धेतून सर्व संघामधून संघ निवडणे | वरील स्पर्धेतून सर्व संघामधून संघ निवडणे |

↓

**आंतर विभागीय स्पर्धा (साखळी पद्धतीने)**
**वरील चार विभागाच्या साखळी पद्धतीने स्पर्धा घेवून त्यामधून विद्यापीठाचा संघ निवडणे.**

↓

**पश्चिम विभागीय/अखिल भारतीय आंतर विद्यापीठीय स्पर्धा/खेला इंडिया स्पर्धा/महाराष्ट्र राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा ''क्रीडा महोत्सव'' (अश्वमेध) स्पर्धाकरीता संघ पाठविणे.**

**२) विभागीय क्रीडा समिती:–**

विभागीय समितीत त्या क्षेत्रात विद्यापीठाशी संलग्न असलेले सर्व महाविद्यालय प्राचार्य/विद्यापीठाचे पदवीधर विभागप्रमुख, शारीरिक शिक्षण, संचालक व मा. प्राचार्याने नियुक्त केलेले इतर विषयांतील अधिकृत अध्यापक या रचनेत येतील. त्याचबरोबर विद्यापीठाचा पदव्युत्तर विभागातील विभाग प्रमुख विभागाचे प्राचार्य म्हणून मानण्यात येतील. त्याच विभागाचे मान्यताप्राप्त मा. संचालक, शारीरिक शिक्षण हे सदस्य म्हणून या समितीत असतील पुढील पदाधिकाऱ्यांची निवड वार्षिक सर्वसाधारण सभेत पुढील वर्षाचे (शेवटच्या सभेत) निश्चित करण्यात येईल.

३) विभागीय कार्यकारी समितीच्या नियुक्तीबाबत:—

विभागाच्या सर्वसाधारण शेवटच्या सभेत पुढील वर्षाचे यजमानपद निश्चित केले जाईल, पुढील वर्षाच्या पहिल्या सर्वसाधारण सभेत अध्यक्ष हे विभागीयकार्यकारी समितीची घोषणा, इतर पदाधिकाऱ्यांची नावे त्याचवेळी जाहिर करतील. आवश्यकतेनुसार उपसमित्या नियुक्त करुन त्यांची कार्ये ठरविणे, विभागीय क्रीडा स्पर्धांशी सुसंगत होईल अशा रीतीने विभागाच्या क्रीडा स्पर्धेचा कार्यक्रम आंतरमहाविद्यालय सचिवांच्या सल्ल्याने तयार करुन तो विभागीय क्रीडा समितीच्या सर्व सभासदांना वेळेवर पाठविणे.

विभागीय कार्यकारी समितीची नियुक्ती कालावधी हि एक शैक्षणिक वर्षासाठी केली जाईल, वाटल्यास सर्वानुमते पुन्हा त्यांची फेरनियुक्ती अथवा बदल पुढील वर्षांसाठी केली जाईल. हे सर्व अधिकार अध्यक्षांना राहतील.

विभागीय कार्यकारी समिती, तक्रार निवारण समिती, संघ निवड समिती, स्पर्धा आयोजक सचिव व सहसचिव या सदस्यांना विद्यापीठाकडून मानधन देण्यात येईल.

विभागातील विभागीय समितीमधील निर्णय विद्यापीठाने ठरवून दिलेल्या नियमांचे अंमलबजावणी करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती नियुक्त करण्यात येईल. तसेच विभागीय कार्यकारी समिती निवडण्याचा अधिकार समितीचे अध्यक्ष व सचिव यांना राहिल.

**सदस्य — १) अध्यक्ष,**

**२) कार्याध्यक्ष,**

**३) विद्यापीठाचे मा. संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण अथवा त्यांचा प्रतिनिधी,**

**४) आंतर विभागीय सचिव व आंतरमहाविद्यालयीन सचिव,**

**५) आंतर विभागीय सहसचिव व आंतरमहाविद्यालयीन सहसचिव,**

**६) मा. अध्यक्षाने निदर्शित केलेल्या विभागाच्या कक्षेतील तीन संचालक, शारीरिक शिक्षण व क्रीडा,**

**७) विभागाचा समन्वयक,**

**८) क्रीडा क्षेत्रातील विश्वसनियता सिध्द केलेले दोन तज्ञ व्यक्ती,**

**९) विद्यापीठ क्रीडा मंडळाचा सदस्य असल्यास.**

४) आंतरमहाविद्यालयीन क्रीडा सचिव व सहसचिवांच्या नियुक्तीबाबत:—

**आवश्यकता:** विभागीय क्रीडा समितीच्या सचिवाचा कार्यभार वाढल्यामुळे, महाविद्यालयांची संख्या वाढल्यामुळे व वेळोवेळी विभागीय स्पर्धेत काही अपरिहार्य कारणांमुळे होणारा बदल व विभागीय क्रीडा समितीच्या सचिवास सर्व आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेस सुरुवातीपासून ते संपेपर्यंत हजर राहता न येणे, आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेतील त्रुटी कमी करणे व इतर सर्व नियमांचे पालन होणे आवश्यक आहे. तसेच आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा सचिव व सहसचिव नेमणे अपरिहार्य असल्यामुळे आंतरमहाविद्यालयीन क्रीडा सचिव व सहसचिव हे पद निर्माण केलेले आहे.

**नियुक्ती:** विभागाच्या आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा सचिव व सहसचिवांची नियुक्ती हि दरवर्षी होणाऱ्या विभागाच्या शेवटच्या सर्वसाधारण सभेत बहुमताने होईल.

**कालावधी:** आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा सचिव व सहसचिवांची नियुक्ती हि एका शैक्षणिक वर्षासाठी केली जाईल. वाटल्यास सर्वानुमते पुन्हा त्यांची फेरनियुक्ती पुढील वर्षांसाठी केली जाईल.

**मानधन व प्रवासखर्च:** विभागाने वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार सदर आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा सचिव व सहसचिवास वैयक्तिक मानधन, त्यांनी केलेला प्रवासखर्च, दैनंदिन भत्ता व त्यांनी करावयाचा अनुषंगिक खर्च हा विद्यापीठाकडून देण्यात येईल.

५) स्वीकृत सदस्यासंबंधीः—

अ) कार्यकारी विभागीय समितीः—

विभागाचा कारभार सुरळीत पार पाडण्यासाठी क्रीडा क्षेत्रातील विश्वसनियता सिध्द केलेले दोन (२) तज्ञ व्यक्तींची एका वर्षांसाठी सदस्य म्हणून नियुक्तीविभागीय कार्यकारी समितीमध्ये करता येईल.

ब) विभागीय क्रीडा समितीः—

प्राचार्य स्वत: ऐवजी आपल्या महाविद्यालयातील वरिष्ठ स्तरांमधील मान्यताप्राप्त एका व्याख्यात्यास शारीरिक शिक्षण संचालकाच्या सर्वसाधारण सभेस उपस्थित राहण्याचा अधिकार सुपूर्त करतील किंवा अशा संचालकाच्या अनुपस्थितीत आपल्या महाविद्यालयातील एका व्याख्यात्याला/शिक्षकाला सर्वसाधारण सभेस उपस्थित राहण्यास सांगू शकतील. मात्र मतदानाच्यावेळी आपल्या महाविद्यालयातील क्रीडा शिक्षक/संचालक, शा. शिक्षण यांपैकी एकाच व्यक्तीस मतदान करता येईल.

६) विभागीय क्रीडा समित्यांच्या सभा घेणेबाबतः—

अध्यक्षाने वर्षातून किमान दोन सभा विभागीय क्रीडा समितीने घेणे बंधनकारक आहे, त्याबरोबर आवश्यकतेनुसार दोहोंपेक्षा जास्त सभा घेण्याचा अधिकार अध्यक्षांना देण्यात येत आहे.

७) विभागीय क्रीडा समितीच्या गणपूर्तीबाबतः—

विभागीय समितीच्या सभेकरीता सदस्यांच्या एकूण संख्येच्या निम्मे (५०%)सदस्य उपस्थिती ही गणपूर्तीकरीता आवश्यक समजण्यात येईल. गणपूर्ती पूर्ण नसल्यास सभा तहकुब समजण्यात येईल व त्यानंतर अर्धा तासानंतर सभा पुन्हा भरवली जाईल तेव्हा उपस्थित सदस्यांची गणपूर्ती समजण्यात येईल.

८) विभागीय क्रीडा समितीच्या सभेच्या अध्यक्षपदाच्या अनुपस्थितीबाबतः—

काही कारणास्तव: अध्यक्ष विभागीय सभेस उपस्थित राहू शकत नसल्यास सभागृहातील उपस्थित अनुभवी सदस्य यांची अध्यक्ष म्हणून निवड करुन सभेचे कामकाज पूर्णकरावे.

९) विभागीय क्रीडा समिती सभेचे नियमः—

१. विभागाच्या सर्वसाधारण सभेत विभागातील संलग्न महाविद्यालयाचे प्राचार्य व त्यांच्या समवेत प्राध्यापक अथवा शा. शिक्षण संचालक हजर राहू शकतील. यजमान महाविद्यालयाच्या दोनपेक्षा अधिक प्राध्यापकांना सभेस हजर राहता येईल. मात्र, मतदानाची वेळ आल्यास एका महाविद्यालयातील एकाच व्यक्तीस मतदानाचा हक्क राहिल.

२. विभागाच्या सर्वसाधारण सभेच्या वेळी नामांकित इतर बाहेरील पाहुण्यांचा सत्कार किंवा अन्य कार्यक्रम ठेवला असल्यास असे सर्व कार्यक्रम झाल्यानंतरच सभेस सुरुवात करावी.

३. विभागाच्या अध्यक्ष्यांनी किमान दोन सभा वर्षातून घेणे बंधनकारक आहे. विशेष बाब म्हणून अध्यक्ष सभा बोलवू शकतील.

४. वर्षाच्या शेवटच्या सर्वसाधारण सभेत अध्यक्ष सचिव, कार्याध्यक्ष सचिव व आंतरमहाविद्यालयीन सचिव ठरविणे व वर्षाच्या पहिल्या सर्वसाधारण सभेत विभागीय कार्यकारी समिती ठरविणे.

५. विभागीय सर्वसाधारण सभेस उपस्थित राहण्यासाठी संबंधित महाविद्यालयातील मा. प्राचार्याचे पत्र सादर करणे आवश्यक आहे.

६. विभागीय सर्वसाधारण सभेच्या सुचनेबरोबरच सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त सर्वांना पाठवावे.

७. आपल्या सर्व सभांमध्ये विषयपत्रिकेत मागील सभेचा इतिवृत्तांत वाचून मंजूर करणे हा पहिला विषय असावा व दुसरा विषय इतिवृत्तांची कार्यवाही हा असावा.

८. विभागीय शेवटच्या सर्वसाधारण सभेच्या वेळी विभागीय क्रीडा समितीच्या सचिवांनी वर्षभराचा अहवाल सभागृहात सादर करणे आवश्यक आहे.

९. विभागीय क्रीडा समितीमार्फत नेमण्यात येणाऱ्या प्रत्येक उपसमितीत विभागीय सचिव, आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा सचिव, सहसचिव, स्पर्धा आयोजक व विभागातील शा. शि. संचालक कि जे क्रीडा मंडळ सदस्य आहेत यांचाही समावेश असलाच पाहिजे.

१०. विभागीय समितीच्या सभेस बाहेरील व्यक्तीस सभेस बसता येणार नाही.

११. सभेचीउपस्थित गणसंख्या ५०% धरण्यात येईल जर गणसंख्या पुर्ण झाली नाही तर तिच सभा ३० मिनीटानंतर गणसंख्या न पाहता सुरु होईल.

१२. विभागीय सचिवांनी आंतर विभागीय संघ जाहीर करणे.

## १०) विभागीय क्रीडा समित्यांचे अधिकार व कार्ये खालीलप्रमाणेः—

१) विभागीय क्रीडा समितीच्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करणे.

२) वेळोवेळी आवश्यकतेनुसार उपसमित्या नियुक्त करुन त्यांची कार्ये ठरविणे.

३) आंतरविभागीय क्रीडा स्पर्धांशी सुसंगत होईल अशा रीतीने विभागाचा आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेचा कार्यक्रम आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा सचिवांच्या सल्ल्याने तयार करुन तो विभागीय क्रीडा समितीच्या सर्व सभासदांना व महाविद्यालयांना वेळेवर पाठविणे.

४) आंतर विभागीय स्पर्धेतहोणारे बदल त्वरीत आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा क्रीडा सचिवास व आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा संयोजन करणाऱ्या महाविद्यालयास कळविणे.

५) आपल्या विभागात होणाऱ्या विभागीय स्पर्धेच्यावेळी संबंधित खेळातील तज्ञ प्राध्यापक व क्रीडा संचालक यांनी स्पर्धा संपेपर्यंत हजर राहून सदरची स्पर्धा सुरळीत पार पडण्यास मदत करणे.

६) आंतरविभागीय स्पर्धेसाठी पाठविण्यात जाणाऱ्या संघाचे पात्रता प्रमाणपत्र व क्रीडा साहित्याची पूर्तता करणे, नियोजित संघव्यवस्थापक व मार्गदर्शक यांना विभागीय स्पर्धांच्या सर्व कार्यक्रमाची रुपरेषा कळविणे. तसेच विद्यापीठामार्फत आंतर विभागीय स्पर्धेकरीता गणवेश घेणे.

७) विभागीय संघ निवडीसाठी जी निवड समिती विभागाने नियुक्ती केली असेल; त्या समितीस आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेचा कार्यक्रम कळविणे तसेच त्याची एक प्रत आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा सचिवांस देणे.

८) आंतर विभागीय क्रीडा समितीच्या सभेचे पत्र संबंधित महाविद्यालयास वेळेवर पाठविणे.

९) विद्यापीठ क्रीडा कार्यालयास विभागीय क्रीडा समिती सभेचे निमंत्रण, विषयपत्रिका व आधीच्या सभेचे इतिवृत्त पाठविणे आवश्यक आहे.

१०) विभागाची क्रीडा समितीची वर्षाची शेवटची सभा झाल्यानंतर पुढील वर्षासाठी निवड होणाऱ्या विभागीय सचिवाकडे खालील बाबींची पुर्तता करणे आवश्यक आहे:
अ) संबंधित वर्षात झालेल्या आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेच्या प्रत्येक खेळाच्या स्वतंत्र फाईल की ज्यात भाग घेणाऱ्या महाविद्यालयाचे पात्रता प्रमाणपत्र, संबंधित भाग्यचक्र, स्पर्धेचा निकाल, विभागीय संघातील खेळाडुंची यादी पुढील वर्षातील सचिवांकडे सुपूर्द करणे.
आ)संबंधित वर्षात झालेल्या सर्व उपसमित्यांचे इतिवृत्त आणि विद्यापीठाने ठरवून दिलेल्या मुद्द्यानुसार नियतकालिन (Magazine) तयार करणे.

११) विभागीय सचिवास ज्या ज्या वेळी काही महत्त्वांच्या कामांसाठी उपसमितीची आवश्यकता भासल्यास त्या त्या वेळी विभागीय सचिवांनी अध्यक्षांच्या परवानगीने व विद्यापीठ क्रीडा मंडळाच्या सल्ल्याने उपसमिती नियुक्ती करणे.

१२) शक्यतो आंतर विभागीय स्पर्धा व आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा हया एकाच दिवशी घेण्यात येऊ नयेत. फारच आवश्यकता भासल्यास दोन्ही स्पर्धा एकाचवेळी आयोजित करण्यास हरकत नाही. मात्र सर्वसामान्य खेळ म्हणजे ज्यात अधिकाधिक खेळाडू जास्तीतजास्त संख्येने स्पर्धेत भाग घेऊ शकतात ते खेळ मात्र एकाचवेळी घेण्यात येऊ नयेत.

१३) क्रीडा प्रो—रेटा निधीविषयी आपआपल्या विभागातील महाविद्यालयांना आपल्या महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांची निश्चित संख्या विद्यापीठास कळविण्यासंबंधी वारंवार प्रयत्न करावेत.

१४) विद्यापीठ क्रीडा मंडळाने आंतर विभागीय क्रीडा स्पर्धेच्या वेळी खेळाडूंच्या शिस्तीचे संघव्यवस्थापकाचे नियम व मार्गदर्शकासाठी केलेल्या सुचना व नियम यांचे पालन करणे.

१५) आंतर विभागीय मैदानी स्पर्धेच्या ठिकाणी विभागीय क्रीडा समितीच्या सचिवांनी हजर राहणे आवश्यक आहे. (संघव्यवस्थापक म्हणून नव्हे.)

१६) विभागीय सचिवांनी आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेसाठी आपआपल्या विभागासाठी विद्यापीठाकडून सांघिक व वैयक्तिक स्पर्धेसाठी किती प्रमाणपत्रे छापली व वरील किती शिल्लक राहिली याचा लेखा—जोखा स्वरुपातील माहिती विभागीय समितीच्या सभेमध्ये सादर करावीत. तसेच सदरच्या अहवालाची प्रत विद्यापीठ क्रीडा मंडळात द्यावे.

१७) आंतरविद्यापीठ सामने ज्या खेळाकरीता भरविण्यात येतात तेवढ्याच खेळांचे आंतरमहाविद्यालयीन सामने घेणे, विद्यापीठाच्या आंतर विभागीय सामन्यांना बाधा न येईल अशा रितीने सामन्यांचा कार्यक्रम ठरविणे.

१८) आंतरमहाविद्यालयीन सामन्यांमधून उद्‌भवणारे कलह निवारण्याकरीता तक्रार निवारण समिती नियुक्त करणे. या समितीच्या विरुद्ध विद्यापीठ क्रीडा मंडळाकडे विनंती अर्ज करता येईल. विभागीय समितीकडून निर्णय आल्यापासून ७२ तासांच्या आत असा लेखी अर्ज दाखल केला पाहिजे. विद्यापीठ क्रीडा मंडळाने दिलेला आदेश अंतिम व बंधनकारक राहिल.

१९) आंतरमहाविद्यालयीन सामन्यांकरीता आर्थिक साहाय्य, देणग्या, ढाली व चषक स्विकारणे.

२०) विभागीय अध्यक्षांच्या समंतीने तातडीच्या विषयासंबंधी उपसमिती नियुक्त करणे व तातडीच्या विषयासंबंधी निर्णय घेणे. तसेच या उपसमितीचा अहवाल विभागीय समितीस माहितीसाठी व इतर कार्यवाहीसाठी ठेवणे.

२१) विभागीय समितीच्या होणाऱ्या सभेस अध्यक्ष, सचिव, क्रीडा समन्वयक, शा. शिक्षण संचालक, अधिकृतप्राध्यापक, कार्यकारी समिती सदस्य व विद्यापीठ कार्यालयीन कर्मचारी यांनाच फक्त हजर राहता येईल. कोणत्याही परिस्थितीत विभागीय समितीच्या सभेस विद्यार्थी वा खेळाडू यांना प्रवेश दिला जाणार नाही.

२२) विभागीय संघाची निवड झाल्यानंतर त्याची मुळ प्रत हि विभागीय सचिवांनी विद्यापीठाच्या आंतर विभागीय स्पर्धेच्या वेळी संघव्यवस्थापकामार्फत जमा करावी.

## ११) विभागीय कार्यकारी समितीचे अधिकार व (सर्वसाधारण सभा) कार्ये:–

- **विभागीय कार्यकारी समितीची कार्ये:**

  १. विभागीय क्रीडा समितीच्या सदस्यांची निवड करणे.

  २. स्पर्धेचे वेळापत्रक तयार करुन स्पर्धेवर नियंत्रण ठेवणे.

  ३. विभागाचा संघ निवडीसाठी निवड समिती तयार करणे.

  ४. विभागातील काही तक्रारी असल्यास त्या तक्रारीचे निवारण करणे.

  ५. आंतर विभागीय स्पर्धेस विभागाचा संघ पाठविणे,

  ६. शैक्षणिक वर्षात कमीतकमी दोन सर्वसाधारण सभा घेणे.

  ७. विद्यापीठ व महाविद्यालयांमध्ये समन्वय साधणे.

  ८. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत/आंतर विभागीय स्पर्धेत क्रीडा गणवेश, दैनंदिन भत्ता संबंधित महाविद्यालय व विद्यापीठाकडून दिला जातो कि नाही याबाबत नियंत्रण करणे.

## १२) विभागीय क्रीडा समितीच्या सचिवांची कार्यपद्धती/विशेष कामे:–

१. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेच्या वेळी विभागीय सचिवांनी सर्व संघाच्या खेळाडूंची पात्रता निवडसमिती सदस्यांकडून प्रमाणपत्रे तपासून घेणे.

२. आंतरमहाविद्यालयीनस्पर्धेच्या वेळी विभागातील संघव्यवस्थापकांना आवश्यक ते मार्गदर्शन करण्यात यावे.

३. विद्यापीठ क्रीडा मंडळाकडून आपणांकडे आलेला विभागीय स्पर्धेचा कार्यक्रम आपल्या विभागातील संबंधित खेळाच्या आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा आयोजित करण्याची संधी मिळालेल्या महाविद्यालयांस त्वरीत कळविणे, सर्वसाधारण सभा, तक्रार निवारण समिती सभा, विशेष सभा, स्पर्धेतील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाना प्रमाणपत्रे (Certificates), मेडल्स् (Medals) चे वाटप करणे, निवड चाचणीसाठी खेळाडूची शिफारस करणे, वेळोवेळी निर्माण होणाऱ्या तक्रारीवर निर्णय घेणे, निवड समितीनां पत्र देणे तसेच विद्यापीठ, क्रीडा समन्वयक, आंतरमहाविद्यालयीन सचिव, सहसचिव व स्पर्धा आयोजक सचिव यांच्याशी समन्वयक साधणे.

४. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेच्या वेळी विभागीय सचिवांच्या महाविद्यालयाचा संघ संबंधित स्पर्धेत भाग घेत नसेल तरी विभागीय सचिव या नात्याने प्रत्येक आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेस जातीने हजर राहून स्पर्धा यशस्वीरीतीने व नियमानुसार आयोजित करण्यात यावी.

५. विद्यापीठ क्रीडा मंडळाने तयार करुन दिलेल्या वार्षिक अहवालामध्ये सर्व माहिती पूर्णपणे तयार करुन वर्षाच्या शेवटी सर्वसाधारण सभेत प्रसिध्द् करावा. हा वार्षिक अहवाल विद्यापीठ क्रीडा मंडळ कार्यालयाकडे पाठवावा/सादर करावा.

६. विद्यापीठ क्रीडा मंडळाकडून प्राप्त झालेले आंतर विभागीय स्पर्धेतील बदल त्वरीत आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा सचिव, सहसचिव व आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा आयोजक महाविद्यालयास त्वरीत कळविणे.

७. आंतर विभागीय स्पर्धेसाठी पाठविण्यात येणाऱ्या संघांच्या पात्रता प्रमाणपत्रेव इ. बाबींची पूर्तता करणे,संघव्यवस्थापक व मार्गदर्शक यांना विभागीय स्पर्धेच्या सर्व कार्यक्रमाची रुपरेषा कळविणे.

८. विभागाच्या संघ निवडीसाठी समिती सदस्यांना विभागाने नियुक्ती केलेल्या सदस्यांना आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेचा कार्यक्रम कळविणे व त्याची एक प्रत आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा सचिव, सहसचिव, आयोजक महाविद्यालय सदस्यांना व प्राचार्यांना देणे.

९. विभागाच्या सर्वसाधारण सभेचे पत्र आपल्या विभागातील सर्व महाविद्यालयांना वेळेवर पोहोचेल याची काळजी घ्यावी.

१०. विद्यापीठ क्रीडा कार्यालयास सर्वसाधारण सभेचे निमंत्रण, विषयपत्रिका व आधीच्या सभेचे इतिवृत्त पाठविणे.

११. सर्वसाधारण सभेतील विषयपत्रिकेत मागील सभेचा इतिवृत्तांत वाचून मंजूर करणे हा पहिला विषय असावा व दुसरा विषय इतिवृत्तांची कार्यवाही हा असावा.

१२. विभागीय क्रीडा समितीच्या सचिवांस ज्यावेळी काही महत्त्वांच्या कामासाठी उपसमितीची आवश्यकता भासल्यास त्यावेळी विभागीय मा. अध्यक्षांना विचारुन व विद्यापीठ क्रीडा मंडळाच्या सल्ल्याने उपसमिती नियुक्ती करावी.

१३. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेपूर्वी विभागाची प्रमाणपत्रे आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा आयोजकांकडे सुपूर्द करणे.

१४. वार्षिक क्रीडा निधीविषयी आपल्या विभागातील महाविद्यालयांना आपल्या महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांची निश्चित संख्या विद्यापीठास कळविण्यासंबंधी वारंवार प्रयत्न करावेत.

१५. आंतर विभागीय स्पर्धेत सहभाग नोंदविण्याची जबाबदारी सचिवांची असेल.

१६. आंतर विभागीय मैदानी स्पर्धेच्या ठिकाणी विभागीय क्रीडा समितीच्या सचिवांनी हजर राहणे आवश्यक आहे. (संघव्यवस्थापक म्हणून नव्हे.)

१७. विभागीय क्रीडा समितीच्या सचिवांनी आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेसाठी आपल्या विभागासाठी विद्यापीठाकडून सांघिक व वैयक्तिक स्पर्धेसाठी किती प्रमाणपत्रे छापली व किती शिल्लक राहिली याचा तपशील लेखी व सविस्तर स्वरुपातील माहिती विभागीय समितीच्या सभेमध्ये सादर करावीत व याबाबत विद्यापीठ क्रीडा मंडळाला तपशील लेखी स्वरुपात द्यावा.

१८. सर्व साधारण सभेच्या आधी आपल्या विभागातील आधीच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त सर्वांना पाठवावे.

१९. विभागीय सचिव व अध्यक्षांनी तीन सभेपेक्षा जास्त सर्वसाधारण सभा आयोजित करावयाचे ठरवले असल्यास तिची पूर्वपरवानगी विद्यापीठक्रीडा मंडळाकडून घेणे बंधनकारक असेल.

२०. विभागाची वर्षाच्या शेवटची सर्वसाधारण सभा झाल्यानंतर पुढील वर्षाच्या होणाऱ्या विभागीय क्रीडा समितीच्या सचिवांकडे खालील बाबींची पुर्तता विभागीय क्रीडा समितीच्या सचिवांनी करणे आवश्यक आहे.
अ)चालू शैक्षणिक वर्षात झालेल्या आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेच्या खेळाचेवेळापत्रक, स्पर्धेतील प्रमाणपत्र विवरण यादी, स्पर्धेचा निकाल, विभागीय संघातील खेळाडुंची यादी सर्व अद्यावत माहिती पुस्तकांच्या स्वरुपात छपाई मार्फत प्रसिद्ध करावी. याबाबत विद्यापीठ क्रीडा मंडळ वेळोवेळी सुचनेनूसार आवश्यकतेनूसार बदल करतील.
ब) शैक्षणिक वर्षामध्येझालेल्या सर्व समिती व सभेचे इतिवृत्त व विद्यापीठ क्रीडा मंडळाने तयार करुन दिलेल्या वार्षिक अहवालामध्ये सर्व माहिती पूर्णपणे तयार करुन सदर वार्षिक अहवाल वर्षाअखेरीस/वर्षाच्या शेवटी प्रसिध्द् करावा. हा वार्षिक अहवाल विद्यापीठ क्रीडा मंडळ कार्यालयाकडे पाठविणे.

२१. विभागीय शेवटच्या सर्वसाधारण सभेच्या वेळी विभागीय क्रीडा समितीच्या सचिवांनी वर्षभराचा अहवाल सभागृहात सादर करणे आवश्यक आहे.

२२. विभागीय क्रीडा समितीच्या सर्वसाधारण सभेचे सुचनापत्र विभागातील सर्व संलग्न महाविद्यालयांना व संलग्न मान्यताप्राप्त संस्थेस सभेच्या दिवसाच्या आधी आठ (८) दिवस अगोदर मिळेल अशारितीने पाठविण्यात यावे वाटल्यास पोस्टाने, दूरध्वनीने वा ई–मेलद्वारे सभेचे सुचनापत्र प्रत्येकास पाठवावे. तसेच आपण पाठविलेल्या पत्रव्यवहारांची नोंद ठेवण्यात यावी.

२३. आंतर विभागीय स्पर्धा व आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा या एकाच दिवशी घेण्यात येऊ नयेत. फारच अडचण भासल्यास दोन्ही स्पर्धा एकाचवेळी घेतल्यास चालू शकेल. मात्र सर्व समावेश खेळ म्हणजे ज्यात अधिकाधिक खेळाडू जास्तीतजास्त संख्येने भाग घेऊ शकतात ते खेळ मात्र एकाचवेळी घेण्यात येऊ नयेत.

२४. विद्यापीठ क्रीडा मंडळाकडून विभागीय क्रीडा समितीकडे आलेल्या पत्रांची कार्यवाही योग्यरितीने व त्वरीत करण्यात यावी; जरी नकारात्मक उत्तर असले तरी लवकरात लवकर आलेल्या पत्राचे उत्तर पाठविणे आवश्यक आहे.

२५. सर्वसाधारण सभा, उपसमितीच्या सभा, निवड समिती सदस्य, व संघ निवडीसंबंधीचा इ. पत्रव्यवहार मा. प्राचार्य व शारीरिक शिक्षण संचालक यांना करण्यात यावा. आधीच्या सभेत पुढील सभेची तारीख निश्चित करु नये.

२६. विभागीय क्रीडा समितीची शैक्षणिक वर्षातील पहिली सर्वसाधारण सभा झाल्याखेरीज विभागाची दुसरी सर्वसाधारण सभा घेऊ नये.

२७. **विभागीय क्रीडा समितीचा सचिव हा निवड समितीचा सदस्य असणार नाही.**

२८. टेबलटेनिस, बॅडमिंटन, स्क्वॅश रॅकेटस्, बुद्धिबळ, टेनिस इ. या विभागीय स्पर्धेत संघ क्रमाने (Ranking) देण्यात यावे.

२९. प्रथम झालेल्या सभेचे इतिवृत्त व त्याची कार्यवाही पूर्ण करावी.

३०. आंतर विभागीय संघ जाहिर करणे.

३१. आंतर विभागीय स्पर्धाकरीता निष्णांत पंचाची नियुक्ती करणे.

## १३) आंतरमहाविद्यालयीन क्रीडा सचिव व सहसचिवांची कामे व कार्यपद्धती:—

१. आंतर विभागीय क्रीडा स्पर्धांशी सुसंगत होईल अशा रीतीने विभागाचा आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेचा कार्यक्रम आंतरमहाविद्यालयीन क्रीडा सचिव व सहसचिव याच्या सल्ल्याने तयार करुन तो विभागीय क्रीडा समितीच्या सर्व महाविद्यालयांना वेळेवर पाठविणे.
२. आंतर विभागीय स्पर्धेतील बदल त्वरीत आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा आयोजक महाविद्यालयास त्वरीत पाठविणे.
३. विभागीय संघात निवड झालेल्या खेळाडूंच्या महाविद्यालयांना निवड झालेल्यांना कळविणे. (जर संघ आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा क्रीडा सचिव अथवा सहसचिवांनी जाहीर केला नसेल तरच)
४. आपल्या विभागातील महाविद्यालयात होणाऱ्या आंतर विभागीय स्पर्धेच्यावेळी आपल्या विभागातील संबंधित खेळातील तज्ञ प्राध्यापकांनी व क्रीडा संचालकांनी स्पर्धा सुरळीत पार पाडण्यासाठी मदत करणे.
५. आंतर विभागीय स्पर्धेसाठी पाठविण्यात येणाऱ्या संघव्यवस्थापक व मार्गदर्शक यांची निवड करणे. (संघव्यवस्थापक हा वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक किंवा शा. शिक्षण संचालक अथवा महाविद्यालयातील अधिकृत अध्यापक असावा. मार्गदर्शक हा महाविद्यालयातील कनिष्ठ अथवा वरिष्ठ महाविद्यालयातील अध्यापक दर्जाचा असावा. कोणत्याही परिस्थितीत या व्यतिरिक्त बाहेरील अन्य व्यक्ती मार्गदर्शक म्हणून नेमू नये.) महिला व पुरुष यांच्या आंतर विभागीय स्पर्धा एकाच ठिकाणी होत असल्यास अशावेळी प्रत्येक संघाबरोबर वेगवेगळा संघव्यवस्थापक पाठविणे आवश्यक आहे.
६. विभागीय क्रीडा समितीच्या सर्वसाधारण सभेचे सुचनापत्र विभागातील सर्व संलग्न महाविद्यालयांना व संलग्न मान्यताप्राप्त संस्थेस सभेच्या दिवसाच्या आधी आठ दिवस अगोदर मिळेल अशारितीने पाठविण्यात यावे वाटल्यास पोस्टाने, दूरध्वनीने वा ई—मेलद्वारे सभेचे सुचनापत्र प्रत्येकास पाठवावे. तसेच आपण पाठविलेल्या पत्रव्यवहारांची नोंद मात्र ठेवण्यात यावी.
७. प्रथमझालेल्या सभेचे इतिवृत्त व त्याची कार्यवाही पूर्ण करावी.
८. आंतर विभागीय संघ जाहिर करणे.
९. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धाकरीता निष्णांत पंचाची नियुक्ती करणे.

## १४) आंतर विभागीय स्पर्धेचे भाग्यपत्रक:—

| | |
|---|---|
| १. प्रथम सामना | — मागील वर्षाचा प्रथम व तृतीय क्रमांकाचा संघ |
| २. द्वितीय सामना | — मागील वर्षाचा द्वितीय व चौथ्या क्रमांकाचा संघ |
| ३. तृतीय सामना | — मागील वर्षाचा प्रथम व चौथ्या क्रमांकाचा संघ |
| ४. चौथा सामना | — मागील वर्षाचा द्वितीय व तृतीय क्रमांकाचा संघ |
| ५. पाचवा सामना | — मागील वर्षाचा तृतीय व चौथ्या क्रमांकाचा संघ |
| ६. सहावा सामना | — मागील वर्षाचा विजेता व उपविजेता संघ |

❖ **विभागीय स्पर्धेचा संघ सामन्यांचा निकाल बरोबरीत असेल तर त्या सामन्यांचा निकाल लावला जाणार नाही, दोन्ही संघास समान गुण दिले जातील. त्याचबरोबर विजेता संघ निवडीकरीता संबधीत खेळातील बरोबरी सोडविण्याचे नियम लावले जातील.**

## १५) आंतर विभागीय स्पर्धेच्यावेळी संघव्यवस्थापकांसाठी सुचना:—

१. विभागाचे संघ आंतर विभागीय स्पर्धेच्या दिवशी सकाळी ९.०० वाजेपर्यंत स्पर्धेच्या ठिकाणी संघ पोहोचेल/रिपोर्ट करतील.
२. आंतर विभागीय स्पर्धेत संघाबरोबर संघव्यवस्थापक असणे आवश्यक आहे. संघव्यवस्थापकांची सभा स्पर्धास्थळी स्पर्धा सुरु होण्याच्या दिवशी सकाळी ९.३० वाजता होईल. त्या सभेत पात्रताप्रमाणपत्र तपासणे, स्पर्धेविषयी नियम इ. बाबत माहिती देण्यात येईल.
३. आंतर विभागीय स्पर्धेच्यावेळी खेळाडूंचे गणवेश संघव्यवस्थापकाने विद्यापीठाकडून घेणे व विभागाच्या शिबीराबाबत योग्यती माहिती घेणे.
४. आंतर विभागीय स्पर्धेच्यावेळीखेळाडूजवळ स्वत:चे चालू शैक्षणिक वर्षाचे ओळखपत्र असणे आवश्यक आहे.
५. आंतर विभागीय स्पर्धेच्यावेळी धुम्रपान करणे, मद्यपान करणे, मोठयाने आरडाओरडा करणे, सामानांची मोडतोड करणे, इतरांना त्रास होईल असे वागणे या गोष्टीनियमबाह्य असून संघव्यवस्थापकांनी आपल्या विभागातील खेळाडूंची शिस्त पाळणे आवश्यक आहे.
६. आंतर विभागीय स्पर्धेत आपला संघ नसल्यास निवडीसाठी पाठविलेल्या महिला व पुरुष खेळाडूबरोबर वेगवेगळे संघव्यवस्थापक असणे आवश्यक आहे.
७. आंतर विभागीय स्पर्धेत खेळाचे साहित्य व त्यास लागणारा खेळाडूंचा गणवेश हा आवश्यक आहे. (उदा. फुटबॉल शूज, स्टॉकिंग्ज्, स्पोर्ट—शर्ट, हाफ पॅन्ट, गोलकिपर पॅड, हॉकी स्टिक, हेलमेट, ग्लोव्हज् इ. साहित्य खेळाडूंजवळ असणे आवश्यक आहे.)

८. आंतर विभागीय स्पर्धेच्या ठिकाणी संघ हजर असल्यास उद्घाटन व इतर समारंभात हजर राहणे बंधनकारक आहे.
९. आंतर विभागीय स्पर्धेच्या वेळी स्पर्धा संपल्यानंतर अथवा आपल्या संघाचे सामने संपल्यानंतर स्पर्धास्थळ सोडण्यापूर्वी निवडसमिती सदस्यांना अथवा स्पर्धा आयोजकांच्या परवानगीने परिसर सोडावा.
१०. आंतर विभागीय स्पर्धेच्या वेळी संघव्यवस्थापकांची पात्रता प्रमाणपत्रे सभेत जमा करावीत.
११. आंतर विभागीय स्पर्धेत संघव्यवस्थापकाने आपल्या संघात असणाऱ्या खेळाडूव्यतिरिक्त इतर विद्यार्थ्यांना स्पर्धेच्या ठिकाणी आणू नये असे खेळाडू आल्यास त्याची निवासव्यवस्था आपण वैयक्तिक करावी.
१२. आंतर विभागीय स्पर्धेत खेळाडूंचे वैयक्तिक पात्रता प्रमाणपत्रे व वैद्यकिय प्रमाणपत्रे सोबत असणे आवश्यक आहे.
१३. आंतर विभागीय स्पर्धेच्या वेळी आपल्या संघास दिलेल्या सर्व स्पर्धा व सामने पूर्ण खेळणे हे सर्व संघास बंधनकारक राहिल.
१४. आंतर विभागीय स्पर्धेच्या वेळी आपल्या संघातील अथवावैयक्तिक खेळातील एखाद्या खेळाडूस विद्यापीठाच्या परवानगीशिवाय स्पर्धा मध्येच सोडून जाता येणार नाही वा एखाद्या खेळाडूने पूर्वलेखी सुचना न देता गैरहजरराहिल्यास अशा खेळाडूंस पुढील शैक्षणिक वर्षाकरीता आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा व आंतर विभागीय स्पर्धेकरीता बंदी घालण्यात येईल.
१५. आंतर विभागीय स्पर्धेची सहभागी प्रमाणपत्र विद्यापीठाकडून तपासून विद्यार्थ्यांना स्पर्धेच्या ठिकाणी देण्यात यावीत त्यावेळी सर्व संघव्यवस्थापकांनी प्रमाणपत्र स्पर्धेच्या ठिकाणीच तपासून घेणे बंधनकारक आहे.
१६. विद्यापीठ क्रीडा मंडळाने आंतरविभागीय स्पर्धेच्यावेळी खेळाडूंना, संघव्यवस्थापकांना, मार्गदर्शकांना निर्गमित केलेल्या नियमांचे पालन करणे.

**१६) वार्षिक क्रीडा अंशदान /(प्रो–रेटा) रक्कम भरणेबाबत:–**

सर्व विद्याशाखेतील संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थाना विद्यापीठ क्रीडा मंडळाने ठरवून दिलेले जिमखाना शुल्क वार्षिक क्रीडा अंशदान निधी (Annual Sports Contribution) म्हणून विद्यापीठात जमा करणे. त्याचबरोबर वार्षिक क्रीडा अंशदान निधीत बदल करण्याचा अधिकार विद्यापीठाकडे राखून ठेवण्यात येत आहे.

**१७) आंतर महाविद्यालयीन खर्चाबाबत:–** आंतरमहाविद्यालयीन खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | प्रकार | खर्च | च्यामार्फत |
|---|---|---|---|
| १) | आंतर महाविद्यालयीन अनुदान | विद्यापीठ क्रीडा मंडळ | विभागीय क्रीडा समन्वयक |
| २) | आंतर महाविद्यालयीन खेळाडू गणवेश | संबधीत महाविद्यालय | महाविद्यालय संघव्यवस्थापक |
| ३) | आंतर महाविद्यालयीन खेळाडू दैनंदिन भत्ता | संबधीत महाविद्यालय | महाविद्यालय संघव्यवस्थापक |
| ४) | आंतर महाविद्यालयीन खेळाडू प्रवासभत्ता | संबधीत महाविद्यालय | महाविद्यालय संघव्यवस्थापक |
| ५) | संघव्यवस्थापक/मार्गदर्शक प्रवासभत्ता | संबधीत महाविद्यालय | संबधीत महाविद्यालय |
| ६) | सर्व निवडसमिती सदस्य/इतर सदस्य भत्ता | विद्यापीठ क्रीडा मंडळ | विभागीय क्रीडा समन्वयक |

**१८) आंतर विभागीय खर्चाबाबत:–** आंतर विभागीय खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | प्रकार | खर्च | च्यामार्फत |
|---|---|---|---|
| १) | आंतर विभागीय स्पर्धा अनुदान | विद्यापीठ क्रीडा मंडळ | विद्यापीठाच्यावतीने |
| २) | आंतर विभागीय खेळाडू गणवेश | विद्यापीठ क्रीडा मंडळ | विद्यापीठाच्यावतीने |
| ३) | आंतर विभागीय खेळाडू दैनंदिन भत्ता | संबधीत महाविद्यालय | महाविद्यालय संघव्यवस्थापक |
| ४) | आंतर विभागीय खेळाडू प्रवासभत्ता | संबधीत महाविद्यालय | संबधीत महाविद्यालय |
| ५) | आंतर विभागीय खेळाडू, संघव्यवस्थापक/मार्गदर्शक यांना प्रोत्साहनपर भत्ता (**Incentives Allowance**) | विद्यापीठ क्रीडा मंडळ | विद्यापीठ क्रीडा मंडळ |
| ६) | विद्यापीठ संघ निवड समिती सदस्यांना भत्ता | विद्यापीठ क्रीडा मंडळ | विद्यापीठाच्यावतीने |
| ७) | संघव्यवस्थापक/मार्गदर्शक प्रवासभत्ता | विद्यापीठ क्रीडा मंडळ | विद्यापीठ क्रीडा मंडळ |

**१९) क्रीडा सुविधा वापराबाबत:–**


क्रीडागणांचा वापर आणि अन्य क्रीडाविषयक सुविधा बाबतीत विद्यापीठ क्रीडा मंडळाच्या गरजेला संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थानी अग्रहक्क दयावा.

# (ब) मुंबई विद्यापीठ कक्षेतील आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा


१) आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेतील भाग्यपत्रक:—

१. अ) आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेच्या भाग्यपत्रकांमध्ये तीन बाय व्यतिरीक्त जादा बाय द्यावे लागत असतील तर, स्पर्धेचे भाग्यचक्र हे खालीलप्रमाणे खेळविल्या जातील. विजेता संघ तळात तर उपविजेता संघ पहिल्या अनु. क्रमांकावर खेळतील.

(नमुना क्र. — १)





(नमुना क्र. — २)






ब) आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेच्या भाग्यपत्रकांमध्ये तीन बाय द्यावे लागत असतील तर, स्पर्धेचे भाग्यचक्र हे खालीलप्रमाणे खेळविल्या जातील.

(नमुना क्र. — १)




(नमुना क्र. — २)






❖ वरील नमुना क्र.१ ते ३ प्रमाणे पुढील भाग्यचक्र ठरवावे.

२. एखाद्या सिंडीगचा संघ स्पर्धेत सहभागी होत नसेल तर ती जागा रिकामी ठेवावी. चिठ्ठ्या टाकूनच रिकाम्या जागेवर निवडीच्या संघास स्थान देण्यात येईल.

३. जर सांघिक स्पर्धेत तीन (३) संघ असतील तर साखळी पद्धतीने स्पर्धा होईल व प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक देण्यात येईल.

४. जर दोन संघापेक्षा कमी संघ असतील तर निवड चाचणी समजण्यात येईल.

५. वैयक्तिक क्रीडा प्रकारात तीन महाविद्यालय व चार खेळाडू सहभागी असतील तर स्पर्धा ग्राह्य धरण्यात येईल अथवा ती निवड चाचणी धरण्यात येईल.

६. सांघिक स्पर्धेसाठी तिन संघ असतील तर स्पर्धा गृहित धरल्या जातील.

७. बाईज् सुरुवात १) विजेता; २) उपविजेता; ३) तिसऱ्या क्रमांकाचा संघ; ४) चौथ्या क्रमांकाचा संघ पुढील बाईज्च्या नियमांनूसार द्यावे.

८. आंतर महाविद्यालय स्पर्धा आयोजनाची जबाबदारी कोणतेही महाविद्यालय घेत नसल्यास संबधीत खेळाची निवडचाचणी घेण्यात येईल. या निवड चाचणीमध्ये फक्त राज्यस्तरीय, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, विद्यापीठ खेळाडू, आंतर विभागीय (विद्यापीठाची) खेळाडू यांनाच संधी देण्यात येईल.

## २) तक्रार निवारण समिती:—

१. विभागीय क्रीडा अध्यक्ष,
२. आंतरमहाविद्यालयीन सचिव,
३. आंतरमहाविद्यालयीन सहसचिव,
४. विभागीय क्रीडा समिती सचिव,
५. त्या खेळातील एक तज्ञ व्यक्ती,
६. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा आयोजकाचे प्राचार्य व शा. शिक्षण संचालक
७. त्या स्पर्धेचे निवड समितीचे सदस्य.

## ३) आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा आयोजकाची कामे:—

१. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेच्या वेळी लागणाऱ्या नियमांनुसार क्रीडांगण, स्पर्धेच्या वेळी लागणारे निष्णांत पंच, गुणलेखक, वेळाधिकारी, प्रेक्षकव्यवस्था व क्रीडांगण या सर्व तांत्रिक बाबींची पूर्तता होते कि किंवा कसे याविषयी सर्व जबाबदारी आंतरमहाविद्यालयीन क्रीडास्पर्धा आयोजकांची राहिल.

२. भाग्यपत्रक तयार करण्यासाठी सभेची तयारी करणे.

३. बाहेरील खेळाडूंची निवासव्यवस्था करणे.
४. संघव्यवस्थापक व मार्गदर्शकांची निवासव्यवस्था करणे.
५. स्पर्धेविषयी सुचना भाग्यपत्रिका सभेत देणे.
६. स्पर्धेचा उद्घाटन, बक्षिस वितरण कार्यक्रम करणे.
७. स्पर्धेचा अहवाल ठरवून दिलेल्या नमुन्यात तयार करुन आंतरमहाविद्यालयीन सचिव किंवा सहसचिवांकडे देणे.
८. सर्व गुणपत्रके आंतरमहाविद्यालयीन सचिव किंवा सहसचिवांकडे देणे.
९. निवड समिती सदस्य, विद्यापीठ क्रीडा मंडळाचा सदस्यांची निवास व्यवस्था शक्यतो वेगळी निवास व्यवस्था करणे.
१०. स्पर्धाकरीता संबधित महाविद्यालयातील संघव्यवस्थापक असणे बंधनकारक राहिल अन्यथा संघ बाद करण्यात येईल.

**४) आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेच्यावेळी संघव्यवस्थापकांसाठी सुचनाः—**

१. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेच्या सुरु होण्याच्या एक दिवस अगोदर सायं. ३.०० वा. सहभागी संघ आयोजित महाविद्यालयास रिपोर्ट/कळविणे. सायं. ४.०० वा. सर्व संघव्यवस्थापकांनी पात्रता प्रमाणपत्र जमा करुन स्पर्धेचे भाग्यचक्र पाडण्यात येतील किंवा स्पर्धेच्या दिवशी ठराविक स्पर्धेच्या ठिकाणी संघ पोहोचतील अशा रितीने घेवून यावेत.
२. पुढील स्पर्धेच्या सुचना त्याचदिवशी सायं. ४.३० वा. सर्व संघव्यवस्थापकांना देण्यात येतील.
३. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेच्यावेळी खेळाडूंच्या गणवेशावर मागे—पुढे नंबर्स/क्रमांक असणे आवश्यक आहे.
४. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेच्यावेळी खेळाडूजवळ स्वतःचे चालू शैक्षणिक वर्षाचे ओळखपत्र असणे आवश्यक आहे.
५. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेच्यावेळी धुम्रपान करणे, मद्यपान करणे, मोठयाने आरडाओरडा करणे, सामानांची मोडतोड करणे, इतरांना त्रास होईल असे वागणे या गोष्टीनियमबाह्य असून संघव्यवस्थापकांनी आपल्या विभागातील खेळाडूंची शिस्त पाळणे आवश्यक आहे.
६. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत आपला संघ नसल्यास निवडीसाठी पाठविलेल्या महिला व पुरुष खेळाडूबरोबर वेगवेगळे संघव्यवस्थापक असणे आवश्यक आहे.
७. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत खेळाचे साहित्य व त्यास लागणारा खेळाडूंचा गणवेश हा आवश्यक आहे. (उदा. फुटबॉल शूज, स्टॉकिंग्ज्, स्पोर्ट—शर्ट, हाफपॅन्ट, गोलकिपर पॅड, हॉकी स्टिक, हेलमेट, ग्लोव्हज् इ. साहित्य खेळाडूंजवळ असणे आवश्यक आहे.)
८. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेच्या ठिकाणी संघ हजर असल्यास उद्घाटन व इतर समारंभात हजर राहणे बंधनकारक आहे.
९. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेच्या वेळी स्पर्धा संपल्यानंतर अथवा आपल्या संघाचे सामने संपल्यानंतर स्पर्धास्थळ सोडण्यापूर्वी निवडसमिती सदस्यांना अथवास्पर्धा आयोजकांच्या परवानगीने परिसर सोडावा.
१०. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत संघव्यवस्थापकाने आपल्या संघात असणाऱ्या खेळाडूव्यतिरिक्त इतर विद्यार्थ्यांना/व्यक्तीस स्पर्धेच्या ठिकाणी आणू नये असे खेळाडू/व्यक्ती आल्यास त्याची निवासव्यवस्था आपण वैयक्तिक करावी.
११. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत खेळाडूंचे वैयक्तिक पात्रता प्रमाणपत्र व शैक्षणिक ओळखपत्र संघव्यवस्थापकांकडे असणे आवश्यक आहे.
१२. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत संबधित खेळातील एकुण संख्येऐवढे खेळाडू हे स्पर्धेत सहभागी होतील. खेळातील संख्येपेक्षा जास्त खेळाडू हे स्पर्धेत सहभागी झाल्यास संघास बाद करण्यात येईल. तसेच विभागीय संघ निवडीकरीता अतिरीक्त खेळाडूचा विचार केला जाणार नाही.

उदाहरणार्थः कबड्डी खेळांमध्ये १२ खेळाडू सहभागी होतील. परंतू त्याच संघातील खेळाडू आंतर विभागीय स्पर्धेच्या रीतसर अर्ज करुन सहभागी होणार असेल तर तो खेळाडू त्या संघातीलच समजण्यात येईल. थोडक्यात आंतर विभागीय निवडचाचणीसाठी खेळाडूंची संख्या हि कमी करुन तेवढेच खेळाडू आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत सहभागी करावेत.

१३. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेची प्राविण्य प्रमाणपत्र विभागातर्फे तपासून विद्यार्थ्यांना स्पर्धेच्या ठिकाणी देण्यात यावीत त्यावेळी सर्व संघव्यवस्थापकांनी प्रमाणपत्र स्पर्धेच्या ठिकाणीच तपासून घेणे बंधनकारक आहे.
१४. विद्यापीठ क्रीडा मंडळाने आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेच्यावेळी खेळाडूंना, संघव्यवस्थापकांना, मार्गदर्शकांना निर्गमित केलेल्या नियमांचे पालन करणे.
१५. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेकरीतासंघव्यवस्थापक (अधिकृत महाविद्यालयाचा शिक्षक/क्रीडा शिक्षक) हा स्पर्धेठिकाणी असणे बंधनकारक आहे तसेच संघव्यवस्थापकाकडे महाविद्यालयाचे ओळखपत्र असावे अन्यथा संघास स्पर्धेत खेळू दिले जाणार नाही.

### ५) आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा निवड समिती सदस्यांसाठी विशेष नियमावली:—

१. आंतरमहाविद्यालयीन निवड चाचणी स्पर्धेतून गुणवत्तेनुसार संबंधित खेळाडूंचा खेळ पाहून स्थाननिहाय (पोझिक्षन—वाईज) विभागाचा संघ निवडण्यात यावा.

२. निवडलेल्या संघांची यादी बंद पाकिटात आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेच्यावेळी उपस्थित असलेल्या विभागीय क्रीडा सचिवांकडेदेणे अथवा विभागीय क्रीडा सचिव उपस्थित नसल्यास निवड समितीपैंकी एका सदस्याने स्वहस्ते विभागीय समन्वयकांकडे सुपूर्त करावे.

३. निवड झालेल्या खेळाडूंची माहितीबाबत गोपनियता बाळगावी.

४. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेच्यावेळी निवड समितीच्या सदस्याने सर्व सामने पाहून विभागीय संघांची निवड करावी.

५. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेतनिवड चाचणीस निवड समिती सदस्यांचे जर कोणी खेळाडू हा नातेवाईक असल्यास तेव्हा निवड समिती सदस्यांची जबाबदारी स्विकारु नये. (उदा. भाऊ, बहिण, चुलतभाऊ—बहिण, भावाची व बहिणीची मुले, तसेच पत्नीकडील नातेवाईक व इतर प्रकारचे जवळचे नातेवाईक)

६. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेच्यावेळीनिवड चाचणीच्यावेळी निवड समिती सदस्यांनी संघाच्या निवडीच्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रकारची जबाबदारी स्विकारु नये. (उदा. पंच म्हणून कामकरणे, ओळखीच्या खेळाडूंना अथवा संघांला मार्गदर्शन करणे, तसेच आलेल्या संघव्यवस्थापकांशी जवळीक साधणे, खेळाडूंच्या नातेवाईकांशी अथवा खेळाडूंच्या ओळखीनी असलेल्याशी जवळीक करणे, इ.)

७. आपण निवड समिती सदस्य आहात याची गोपनीयता बाळगणे.

८. आपणांस विभागाने दिलेल्या तारखा व वेळेनुसार स्पर्धास्थळी उपस्थित रहावे.

९. निवड समिती सदस्य म्हणून नियुक्त झाल्यानंतर संबंधित स्पर्धेच्या निवड समिती सदस्य म्हणून जबाबदारी स्विकारीत आहात किंवा नाही याविषयीची माहिती विभागीय क्रीडा समिती अध्यक्ष वा कार्यालयास त्वरीत कळविणे आवश्यक आहे.

१०. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेमध्ये सर्व खेळाडूंना खेळण्याची संधी दिली आहे का? किंवा संधी दिली नसल्यास अशा खेळाडूंची निवड चाचणी घेण्याचा अथवा न घेण्याचा सर्वस्वी अधिकार आपणांकडे राहिल.

११. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेच्या वेळी जर एखादा खेळाडू राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय अधिकृत स्पर्धेस गेला असेल तर त्या खेळाडूचा अर्ज संबंधित महाविद्यालयातील प्राचार्यामार्फत विभागीय सचिवांकडे पाठवावा. सदर खेळाडू हा आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत भागघेतला नाही असा शेरा संबंधित सचिवाने द्यावा. सदरचा अर्ज विभागीय क्रीडा सचिवांकडे आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेपूर्वी जमा करावा.

१२. आंतरमहाविद्यालयीन क्रीडा समितीने नियुक्त केलेल्या निवडसमिती सदस्यांपैकी काही सदस्य निवडचाचणीकरीता क्रीडा समितीस न कळविता अथवा पूर्वसुचना न देता स्पर्धेच्या वेळी अनुपस्थित राहिल्यास अशा सदस्यांना एक वर्षासाठी निवड समिती सदस्य म्हणून काम करता येणार नाही.

१३. विभागीय संघात निवड झालेल्या कोणत्याही खेळाडूंनी मी पुढील स्पर्धा खेळणार नाही अथवा स्पर्धेत भाग घेईन किंवा घेणार नाही. तसेच आंतर विभागीय स्पर्धेत खेळेन वा खेळणार नाही असे तोंडी सांगितले अथवा लेखी कळविले असले तरी त्या खेळाडूंचा विभागीय संघ निवडीकरीता विचार करण्यात यावा.

१४. काही कारणास्तव आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा न होता निवड चाचणी घ्यावी लागली तर राज्य/आंतर विभागीय (विद्यापीठस्तर)/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय व आंतर विद्यापीठ खेळणाऱ्या खेळाडूंनाच निवड चाचणीकरीता परवानगी द्यावी.

## (क) मुंबई विद्यापीठातील खेळाडूंसाठी शिस्तीचे नियम

### १) मुंबई विद्यापीठ संघाची निवड व इतर शिस्तीविषयी:—(आंतरमहाविद्यालय, आंतर विभागीय व आंतर विद्यापीठांकरीता)

१. मुंबई विद्यापीठाच्या संघ हा आंतर विभागीय स्पर्धा घेऊन निवडण्यात येईल. परंतू काही कारणास्तव स्पर्धा भरविणे अशक्य झाल्यास मुंबई विद्यापीठाचा संघ निवड चाचण्या घेऊन निवडण्यात येईल.

२. आंतर विभागीय सामने/निवड चाचणी झाल्याबरोबर त्याच ठिकाणी संघाची निवड करण्यात येईल. परंतू, विद्यापीठ क्रीडा मंडळाने केलेल्या नियमानुसार एखाद्या खेळाडूचा अर्ज विभागीय स्पर्धेपूर्वी विद्यापीठाकडे जमा झाला असेल तर अशा खेळाडूंचा विचार निवड चाचणीसाठी होईल.

३. आंतर विभागीय स्पर्धा/निवड चाचणी झाल्याबरोबर निवडसमितीच्या सदस्यांनी निवड झालेल्या खेळाडूंची यादी ताबडतोब विद्यापीठ क्रीडा मंडळाच्या संचालकाकडे/उपस्थित असलेल्या प्रतिनिधीकडे सीलबंद पाकिटात द्यावी. तसेच सीलबंद पाकिट मा. संचालक, क्रीडा व शा. शिक्षण/विद्यापीठ क्रीडा मंडळ यांचेकडे सुपूर्द करावे.

४. प्रत्येक खेळाकरीता स्वंतत्र निवडसमिती नियुक्त करण्यात येईल. निवडसमितीची नियुक्ती विद्यापीठ क्रीडा मंडळ मार्फत केली जाईल. एखाद्या खेळाकरीता शारीरिक संचालकाव्यतिरिक्त अन्य निवडसमिती सदस्यांची नियुक्ती केली जाईल. क्रीडा मंडळाने तयार केलेल्या यादीतूनच निवड समिती सदस्यांची नियुक्ती होईल. एक/दोन पात्र निवड समिती सदस्यांची नावे राखीव येतील.

५. आंतर विद्यापीठ संघात निवड खेळाडूंचा आंतर विभागीय/निवड चाचणीतील खेळातील प्राविण्य, संघाचे स्पर्धेतील स्थान, खेळातील स्थान इ. बाबींवर अवलंबून असेल. आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धेत भाग घेणाऱ्या प्रत्येक संघाकरीता मा. संचालक, विद्यापीठ क्रीडा मंडळ हे एक अधिकृत प्रशिक्षक नेमणूक करतील व नियुक्त करण्यात आलेल्या प्रक्षिशकामार्फत खेळातील कौशल्य, तंत्र, डावपेच इ. सराव शिबीरे आयोजित करणे. आंतर विद्यापीठ सामन्यांपूर्वी काही सरावाचे सामने घेणे, त्यामध्ये सराव सामन्यांमध्ये खेळाडूंचे निरीक्षण करणे. संघाचा योग्य समन्वय होण्याच्या दृष्टीने योग्य त्या स्थानिक सामन्यांमध्ये विद्यापीठ संघाला प्रवेश घेण्याचे पुरस्कृत करणे.

६. मुंबई विद्यापीठ संघाचे सराव वा प्रशिक्षण शिबीरे घेण्यात येईल. विद्यापीठाकडून प्रशिक्षण व सराव शिबीरांचा कालावधी कमीतकमी ७ दिवसांचा असेल. प्रशिक्षण कालावधीच्या अखेरीस, नियमितपणा आणि खेळाडूंचा खेळ या विषयी प्रशिक्षक आपला अहवाल सादर करील. निवडसमितीचा अध्यक्ष आणि अधिकृत प्रशिक्षकांना विद्यापीठ क्रीडा मंडळाचे संचालक आवश्यक वाटल्यास पाचारण करतील.

७. मुंबई विद्यापीठाने नियुक्त केलेल्या निवड समितीने निवडलेल्या विद्यापीठाचा संघ अंतिम राहील. मात्र निवड झालेल्या खेळाडूंतील एखाद्या खेळाडूला अपात्रता, गैरवर्तणूक, खेळबाह्यवर्तन कारणाकरीता विद्यापीठ संघातून वगळण्याचा अधिकार मा. संचालक, विद्यापीठ क्रीडा व शा. शिक्षण मंडळाकडे राहील.

८. विद्यापीठाने नियुक्त केलेल्या निवड समितीला खेळाडूंचा एकंदर दर्जा, संघाचा एकंदर दर्जा निकृष्ट वाटल्यास त्यावर्षी आंतर विद्यापीठ सामन्यांकरीता संघ पाठवू नये असे निवड समितीतील संचालक, क्रीडा व शा. शिक्षण यांना विद्यापीठ क्रीडा मंडळाला सुचविण्याचा अधिकार राहील. संघ आंतर विद्यापीठ सामन्याकरीता पाठविणे योग्य आहे किंवा नाही याविषयी निवडसमितीने आपल्या अहवालात स्पष्ट उल्लेख करावा.

९. अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेतील व स्पर्धेबाहेरील वर्तनाची जबाबदारी ही मार्गदर्शक व संघव्यवस्थापकांची जबाबदारी राहिल. सर्व स्पर्धेमधील खेळाडू संबधीत कोणत्याही बाबतीतील संघव्यवस्थापकाचा निर्णय हाअंतिम व बंधनकारक राहील. स्पर्धा संपल्यानंतर संघव्यवस्थापकाने १५ दिवसांच्या आत संघाच्या खेळाच्या बाबतीतील संघाचा अहवाल सादर करणे आवश्यक आहे. अहवाल सादर करणे हि सर्वस्वी जबाबदारी संघव्यवस्थापकाची असेल.

विद्यापीठ संघातील खेळाडूंचे क्रीडांगणावरील व क्रीडांगणाबाहेरील वर्तन असमाधानकारक आढळल्यास अशा खेळाडूंवर आवश्यक ती कारवाई संघव्यवस्थापकाने करावी यामध्ये स्पर्धेत खेळू देणे. खेळाडूस स्वत:च्या निवासाच्या गावी ताबडतोब परत पाठवून द्यावे. मात्र, या घटनेविषयीचा अहवाल ताबडतोब मा. संचालक, विद्यापीठ क्रीडा मंडळ यांच्याकडे पाठविणे तसेच अध्यक्षांशी सल्लामसलत करुन अन्य कोणतीही कारवाई करण्याचा अधिकार मात्र मा. संचालक, विद्यापीठ क्रीडा मंडळ यांच्याकडे अंतिम राहिल.

१०. आंतर विद्यापीठ स्पर्धेकरीता संघव्यवस्थापकांबरोबरच सर्व खेळाडू स्पर्धेच्या दरम्यानचा प्रवास करतील, स्पर्धेच्या ठिकाणी निवासव्यवस्था असेल तिथेच राहणे बंधनकारक आहे. कोणत्याही खेळाडूस नातेवाईक, मित्र, मैत्रिणीकडे निवासाकरीता जाता येणार नाही. आंतर विभागीय स्पर्धेकरीता सर्व महाविद्यालयाने आपल्या खेळाडूंना स्पर्धेच्या ठिकाणी रिपोर्ट करावे. स्पर्धेच्या ठिकाणी सर्व खेळाडू, संघ व्यवस्थापक उपस्थित राहणे बंधनकारक आहे.

११. आंतर विद्यापीठ स्पर्धेकरीता निवड झालेल्या खेळाडूंपैकी जर एखादे पालक आपल्या पाल्याला स्वत: अथवा स्वखर्चावर पाठविणार असतील तर त्याची संपूर्ण जबाबदारी ही संबंधीत पालक व पाल्य यांच्यावर असेल. अशा परिस्थितीमध्ये संबंधीत खेळाडूने महाविद्यालयाच्या प्राचार्यामार्फत योग्यत्या परवानगीचे पत्र मा. संचालक, क्रीडा व शा. शिक्षण / विद्यापीठ क्रीडा मंडळ यांच्याकडे सादर करणे गरजेचे असेल. अन्यथा सदर बाब हि खेळाडूकरीता गैरवर्तणूक ग्राह्य धरण्यात येईल.

## २) विद्यापीठ खेळाडूंच्या शिस्तीविषयी:— (आंतरमहाविद्यालयीन, आंतर विभागीय व आंतर विद्यापीठ स्पर्धेच्यावेळी)

१. प्रत्येक खेळाडूंजवळ संबंधित महाविद्यालयाचे चालू शैक्षणिक वर्षाचे ओळखपत्र असणे आवश्यक आहे.

२. सामन्यांच्या उद्‌घाटनाच्या वेळी सर्व खेळाडूंनी मार्चपास्टच्या वेळी संघव्यवस्थापकाने योग्य त्या गणवेशातखेळाडूंना हजर ठेवलेच पाहिजे.

३. आंतरमहाविद्यालयीन सामन्यांच्या वेळी कोणत्याही विभागाच्या संघातील खेळाडूंचे वर्तन शिस्तबाह्य आढळून आल्यास त्या संघाला बाद करण्याचा अधिकार आयोजक महाविद्यालयाच्या प्राचार्यांना व निवड समितीला देण्यात येत आहे.

४. आंतर विभागीय स्पर्धेसाठी पात्रताप्रमाणपत्रामध्ये (Eligibility Form) ज्या विद्यार्थी खेळाडूंची नावे आहेत अशाच खेळाडुंना आंतर विभागीय सामने आयोजित करणाऱ्या महाविद्यालयाने दिलेल्या निवासी सुविधांचा लाभ घेता येईल. या व्यतिरिक्त कोणत्याही खेळाडूंस महाविद्यालयाच्या आवारात मुक्काम करता येणार नाही/मुक्कामी राहता येणार नाही.

५. आंतर विभागीय स्पर्धेच्यावेळी उद्‌घाटन कार्यक्रमास ज्या विभागाचे खेळाडू हजर राहणार नाहीत त्या खेळाडूंना आंतर विभागीय स्पर्धेत भाग घेऊ दिला जाणार नाही. अपवादात्मक परिस्थितीमध्ये हे अधिकार मा. संचालक, विद्यापीठ क्रीडा मंडळाकडे राखून ठेवण्यात येत आहे.

६. आंतरमहाविद्यालयीन, आंतर विभागीय व आंतर विद्यापीठीय सामन्यांच्या वेळी सामन्यांच्या ठिकाणी खेळाडू विद्यार्थ्यांनी शिस्त पाळली पाहिजे. ज्या विभागाकडून सामने आयोजित करणाऱ्या महाविद्यालयांचे सुविधांचे नुकसान झाल्यास (इलेक्ट्रिक वायर, फिटिंग, बल्ब, पाण्याचे नळ, माठ, ग्लास, सतरंज्या, क्रीडांगणावरील साहित्य, वर्गातील बेंचेस्, खुर्च्या, फलक, इत्यादी) नुकसान भरपाई संबंधित महाविद्यालय/खेळाडूने आयोजक महाविद्यालयास द्यावी लागेल.

७. आंतरमहाविद्यालयीन, आंतर विभागीय व आंतर विद्यापीठीय सामने आयोजित करणाऱ्या महाविद्यालयाच्या आवारात व इमारतीत खेळाडूंना पत्ते खेळणे, मद्यपान, धुम्रपान करण्याची सक्त मनाई आहे. या नियमांचे नियमोल्लंघने आढळल्यास खेळाडूस अथवा त्याच्या संघास स्पर्धेमधून बाद करण्यात येईल.

८. आंतरमहाविद्यालयीन, आंतर विभागीय व आंतर विद्यापीठीय सामने आयोजित करणाऱ्या महाविद्यालयाने केलेल्या निवाससुविधा पसंत नसल्यास संघव्यवस्थापकाने आयोजित महाविद्यालयाच्या परवानगीनेच आपण बाहेर राहू शकतील.

९. आंतरमहाविद्यालयीन, आंतर विभागीय व आंतर विद्यापीठीय सामन्यांच्या वेळी खेळाडूंना रात्री ०९ वाजेनंतर होणारे सिनेमा, नाटक, करमणुकीचे कार्यक्रम, इ. यांस जाता येणार नाही.

१०. आंतर विभागीय महिला स्पर्धेच्यावेळी फक्त महिला खेळाडूंची, संघव्यवस्थापक, निवडसमिती सदस्य व पंच यांचीच निवास व्यवस्था आयोजित महाविद्यालयातर्फे केली जाईल. महिला स्पर्धेच्यावेळी पुरुष खेळाडू विद्यार्थ्यांस सामने आयोजित करणाऱ्या महाविद्यालयात निवासव्यवस्था करण्यात येणार नाही.

११. आंतरमहाविद्यालयीन, आंतर विभागीय व आंतर विद्यापीठीय स्पर्धेच्या वेळी खेळाडूंनी सामने आयोजित करणाऱ्या महाविद्यालयात रात्रीच्यावेळी आरडाओरड इतरांना त्रास होईल असे वागणे, गोंधळ घालणे इ. कृत्य करु नये. त्याचबरोबर सर्व सहभागी महाविद्यालयांनी आयोजित महाविद्यालयाचे नियम पाळणे बंधनकारक राहतील.

१२. आंतरमहाविद्यालयीन, आंतर विभागीय व आंतर विद्यापीठीय स्पर्धेच्या वेळी खेळाडूंची स्पर्धा आयोजित करणाऱ्या महाविद्यालयाने निवासव्यवस्था केली आहे तिथेच राहणे बंधणकारक आहे. इतर पाहूणे, मित्र, मैत्रिणी, नातेवाईक इत्यादींकडे राहण्यास परवानगी नाही.

१३. सर्व खेळाडू, संघ व्यवस्थापक व मार्गदर्शक यांनी वेळोवेळी दिलेल्या सुचना व आदेशाचे पालन करणे बंधनकारक आहे.

१४. स्पर्धेच्यावेळी खेळाडू, संघ व्यवस्थापक व मार्गदर्शक आयोजक महाविद्यालये यांना क्रीडांगण व क्रीडांगणाबाहेर विद्यापीठाने वेळोवेळी निर्देशित केलेले शिस्तीचे व नियमांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे.

१५. आंतरमहाविद्यालयीन, आंतर विभागीय व आंतर विद्यापीठीय स्पर्धा संपल्यानंतर प्रेक्षणीय स्थळी इतर कोणत्याही स्थळी जाण्यासाठी मा. संघव्यवस्थापकाच्या परवानगीनेच जाणे बंधनकारक आहे. परंतू अशा परिस्थितीमध्ये सर्वस्वी जबाबदारी हा खेळाडूंची असेल.

१६. जे महाविद्यालयाने तीन, चार वर्षांचे एकच ओळखपत्र दिले आहे अशा सर्व विद्यार्थ्यांनी चालू वर्षांची सर्व फी जमा केलेल्या पावत्या स्पर्धेच्यावेळी सोबत ठेवणे शक्तीचे आहे.

१७. आंतरमहाविद्यालयीन, आंतर विभागीय व आंतर विद्यापीठीय स्पर्धेत भाग घेण्यासाठी ज्या वर्गात, त्या वर्गाची शैक्षणिक वर्षाकरीताची शैक्षणिक पात्रता व अखिल भारतीय विश्वविद्यालय संघटना (AIU) ने ठरवून दिलेल्या पात्रतेत बसणे बंधनकारक आहे. अन्यथा सदर खेळाडूस स्पर्धेत भाग घेता येणार नाही.

१८. मुंबई विद्यापीठाने ठरवून दिलेल्या खेळाच्या प्रकारांमध्ये मुंबई विद्यापीठास संघ आंतर विद्यापीठ स्पर्धेत भाग घेईल. त्या व्यतिरिक्त अखिल भारतीय विश्वविद्यालय संघटना (AIU) च्या यादीत असलेल्या खेळांच्यासाठी वैयक्तिक अथवा सांघिक खेळाडूंना विद्यापीठामार्फत कोणत्याही प्रकारची शिफारस होणार नाही.

१९. अखिल भारतीय विश्वविद्यालय संघटना (AIU) च्या खेळाव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारची आंतरमहाविद्यालयीन व आंतर विभागीय स्पर्धा मुंबई विद्यापीठ क्रीडा मंडळामार्फत घेण्यात येणार नाहीत.

२०. आंतरमहाविद्यालयीन, आंतर विभागीय व आंतर विद्यापीठीय स्पर्धामध्ये विद्यार्थी खेळाडूंने सर्व स्पर्धा ह्या खेळाडूं वृत्ती व खेळ भावनेने खेळाव्यात तसेच खेळाडूंने स्वत: ला अपाय करुन स्पर्धेस सहभाग होत असेल तर त्याच्या तब्यतेची संपूर्ण वा सर्वस्वी जबाबदारी ही संबधित खेळाडूची राहील.

# प्रकरण – चार

## मुंबई विद्यापीठ क्रीडा मंडळ

दि. ०१ मार्च, २०१७ पासून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ५७ (ग) नुसार क्रीडा संस्कृतीच्याप्रचालनासाठी आणि खेळांशी संबंधित कार्यक्रमांकडे लक्ष देण्यासाठी विद्यापीठामध्ये क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ असेल. मंडळाची कामे मा. संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण यांच्याकडून पार पाडण्यात येतील.

**१. क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळामध्ये पुढीलप्रमाणे सदस्यांचा समावेश असेल:—**

१) मा. कुलगुरु – अध्यक्ष;

२) मा. प्र—कुलगुरु— उपाध्यक्ष;

३) विविध क्रीडा क्षेत्रांतील विश्वसनीयता सिद्ध केलेले, कुलगुरुंनी नामनिर्देशित केलेले तीन व्यावसायिक;

४) ज्या जिल्ह्यांमध्ये विद्यापीठाचे मुख्यालय आहे त्या जिल्ह्यांचा जिल्हा क्रीडा अधिकारी;

५) व्यवस्थापन परिषदेने विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण विभागातील नामनिर्देशित केलेला एक अध्यापक;

६) व्यवस्थापन परिषदेने संलग्न, संचालित किंवा स्वायत्त्व महाविद्यालयांमधून नामनिर्देशित केलेले दोन क्रीडा अध्यापक;

७) एक वर्षाचा पदावधी असलेला क्षेत्रीय किंवा विभागीय अध्यक्ष (प्रमुख महाविद्यालयाचा प्राचार्य) व सचिव (प्रमुखमहाविद्यालयाचा शारीरिक शिक्षण संचालक);

८) विद्यापीठ विद्यार्थी परिषदेचा अध्यक्ष/सचिव ;

९) कलम ९९, पोट—कलम (४), उप—खंड (ख) च्या उप—पोट—खंड (पाच) अन्वये, विद्यापीठ विद्यार्थीपरिषदेच्या अध्यक्षाने विद्यापीठ विद्यार्थी परिषदेच्या क्रीडा क्षेत्रातून नामनिर्देशित केलेला एक विद्यार्थी सदस्य;

१०) मा. संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण – सदस्य—सचिव.

**२. सदस्यांच्या मुदतीसंबंधी:—**

स्थानिक क्रीडा समितीच्या अध्यक्षपदाच्या निवडीकरीता महाविद्यालयाचे प्राचार्य/मान्यताप्राप्त संस्थांचे प्रमुख/पदव्युत्तर विद्यापीठ जिमखाना अध्यक्षांपैकी व्यक्तीच फक्त पात्र समजण्यात येईल.

**३. क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे पुढील अधिकार व कर्तव्ये:—**

१) महाविद्यालयांमधील आणि विद्यापीठ विभागामधील क्रीडा क्षेत्रातील क्रीडा संस्कृती व कार्यक्रम यांच्या प्रचालनासाठी आवश्यक त्या उपाययोजना करणे;

२) विविध क्रीडा क्षेत्रांमधील प्रादेशिक व राष्ट्रीय मंडळांशी दुवा साधणे आणि त्यांच्यासोबत संयुक्तरीत्या विविध कार्यक्रमांचे प्रचालन करणे;

३) क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या कार्यामध्ये गट, संस्था आणि इतर व्यावसायिक मंडळे यांना सहभागी करुन घेता यावे यासाठी त्यांच्याशी संपर्क साधणे;

४) क्रीडा क्षेत्रामधील विद्यापीठाचे धोरण आणि राष्ट्रीय धोरण यानुसार विविध खेळांमध्ये अभिरुची तसेच कौशल्ये यांच्या प्रचालनासाठी महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था व विद्यापीठ विभाग यांमध्ये उपक्रम हाती घेणे;

५) समाजाला, महाविद्यालये, परिसंस्था व विद्यापीठ यांना जवळ आणण्यासाठी विविध क्रीडा प्रकार क्षेत्रांमधील विद्यापीठस्तरीय स्पर्धा, क्रीडा कौशल्ये विकास शिबीरे, सहभागी कार्यक्रम तसेच प्रशिक्षण कार्यशाळा यांचे आयोजन करणे;

६) विविध क्रीडा प्रकारातील सुप्रशिक्षित संघांना प्रादेशिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरीय कार्यक्रम व स्पर्धामध्ये सहभाग घेण्यास प्रोत्साहन देणे;

७) आदेशाद्वारे विहित केल्याप्रमाणे, परीक्षांच्या संबंधित वेळापत्रकांच्या दरम्यान आंतर विद्यापीठीय किंवा राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये किंवा कार्यक्रमांमध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या संबंधात पर्यायी व्यवस्था करण्यासाठी सक्षम प्राधिकरणाला शिफारस करणे;

८) क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाची उद्दिष्टे पूर्ण करता यावी यासाठी विद्यापीठ प्राधिकरणाकडून असे अन्य कोणतेही काम हाती घेणे.

### ४. विद्यापीठ क्रीडा मंडळाच्या सभा:—

विद्यापीठ क्रीडा संचालकाने विद्यापीठ क्रीडा मंडळाच्या अध्यक्षांशी विचारविनियम करुन निश्चित केलेल्या तारखेला घेण्यात येतील. सामान्यपणे एका शैक्षणिक वर्षात कमीतकमी दोन सभा आयोजित करण्यात येतील. याशिवाय अध्यक्ष, विद्यापीठ क्रीडा मंडळ यांना योग्यवाटेल त्या दिवशी सचिव/मा. संचालक, विद्यापीठ क्रीडा मंडळ हे मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभा आयोजित करण्याविषयी सुचना काढतील.

### ५. विद्यापीठ क्रीडा मंडळाच्या अध्यक्षपदासंबंधी :—

विद्यापीठ क्रीडा मंडळाच्या सर्व सभांना मा. कुलगुरु हे अध्यक्षस्थानी राहतील व त्यांच्या गैरहजेरीत विद्यापीठ क्रीडा मंडळाचे मा. प्र—कुलगुरु (उपाध्यक्ष) हे अध्यक्षस्थान धारण करतील. अध्यक्ष व उपाध्यक्ष हे दोघेही अनुपस्थित असल्यास सभा ही आपणातून एकाची अध्यक्षपदी निवड करील. सभेकरीता चार सदस्यांची गणसंख्या राहिल. गणसंख्यापूर्ती न झाल्यास सभा स्थगित होईल आणि स्थगित सभा तीस (३०) मिनिटांनी सुरु होईल आणि उपस्थित सदस्यांचीच गणपूर्ती झाल्याचे मानण्यात येईल.

### ६. विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाने करावयाची कामे:—

१. आंतर विभागीय स्पर्धांवर सर्वसाधारण नियंत्रण राखणे.
२. विद्यापीठाच्या कोणकोणत्या संघांना आंतर विद्यापीठ स्पर्धांकरीता पाठवावे हे निश्चित करणे.
३. योग्य वाटतील अशा समित्या, उपसमित्या नियुक्त करुन त्यांना कार्ये नियुक्त करुन देणे आणि अशा समित्यांकडून येणाऱ्या शिफारशींच्या आधारे योग्य निर्णय घेणे.
४. संघटन समिती व अन्य उपसमित्या नियुक्त करुन आंतर विद्यापीठ क्रीडा मंडळाकडून ज्या स्पर्धांचे आयोजन करण्याची जबाबदारी सोपविण्यात येईल त्या स्पर्धांचे संयोजन करणे.
५. स्पर्धेमध्ये भाग घेण्याऱ्या किंवा न घेणाऱ्या प्रत्येक संस्थेकडून प्रत्येक विद्यार्थ्यामागे विद्यापीठ क्रीडा मंडळ वेळोवेळी निर्देशित करील त्याप्रमाणे वार्षिक क्रीडा अंशदान (प्रो—रेटा) आकारणे व स्विकारणे. हि वर्गणी मुंबई विद्यापीठ क्रीडा मंडळाने निर्देशित केलेल्या मुदतीत विद्यापीठात जमा करावी.
६. विद्यापीठ क्रीडा मंडळाकडे वार्षिक अंदाजपत्रक तयार करुन ते विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेमध्ये सादर करावे.
७. आंतर विभागीय स्पर्धेच्या उद्‌घाटनाच्यावेळी सर्व खेळाडू उपस्थित राहणे, पंचाचे निर्णय, मार्गदर्शक/संघव्यवस्थापक याबाबत निर्णय घेणे, आंतर विभागीय स्पर्धेकरीता क्रीडा गणवेश, आंतर विभागीय स्पर्धेकरीता निवासी व्यवस्था करणे तसेच विविध विद्यापीठ संघांकरीता संघव्यवस्थापक व प्रशिक्षक/मार्गदर्शन नियुक्त करणे.
८. आंतरमहाविद्यालयीन व आंतर विभागीय स्पर्धा आयोजित करणाऱ्या महाविद्यालयांना किंवा विभागांना उचित अग्रिम रक्कम / निधीमंजूर करणे.
९. विविध क्रीडा प्रकारांतील प्रशिक्षण प्रकल्प/शिबीरांचे आयोजन करणे.
१०. क्रीडा आयोगाच्या अनुषंगाने विभागीय समित्यांच्या निर्णयाच्या विरुद्ध दाद मागणाऱ्या याचिका आल्यास त्यानिकाली काढणे.
११. क्रीडा संवर्धन आणि संयोजन याबाबत विभागीय समित्या/महाविद्यालये यांच्या कार्यावर देखरेख करणे, सल्ला देणे व सुचना करणे.विद्यापीठाच्या उद्देशपूर्तीच्या दृष्टीने पोषक आणि अनुषंगिक कार्ये करणे.

### ७. सदस्यांना द्यावयाचे भत्ते:—

विद्यापीठाच्या वेळोवेळी प्रचलित असणाऱ्या नियमानुसार विद्यापीठ क्रीडा मंडळाचे सदस्य, विद्यापीठ क्रीडा मंडळाने नियुक्त केलेल्या उपसमिती सदस्य सभेला उपस्थित राहण्याकरीता प्रवास, निवास व वाहन भत्ता मिळण्यास प्राप्त राहतील.

### ८. वार्षिक क्रीडा अंशदान /(प्रो—रेटा) रक्कम भरणेबाबत:—

सर्व विद्याशाखेतील संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थाना विद्यापीठ क्रीडा मंडळाने ठरवून दिलेले जिमखाना शुल्कवार्षिक क्रीडा अंशदान निधी (Annual Sports Contribution) म्हणून विद्यापीठात जमा करणे. त्याचबरोबर वार्षिक क्रीडा अंशदान निधीत बदल करण्याचा अधिकार विद्यापीठाकडे राखून ठेवण्यात येत आहे.

## ९. विद्यापीठ संघाच्या खर्चासंबंधीचे नियमः–

१. आंतर विद्यापीठ सामन्यांमध्ये विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करण्याकरीता निवड झालेल्या विद्यार्थ्यांना द्वितीय श्रेणीचे रेल्वेचे अगर एस.टी. चे भाडे किंवा उपलब्ध झाल्यास सवलतीच्या दराचे भाडे आणि जागा आरक्षण आकार व शयन आरक्षण आकार देण्यात येईल. रेल्वे भाड्यात जागा मिळण्याच्या सोयीच्या दृष्टीने प्रवासातील आगमणाच्या ठिकाणाऐवजी (स्पर्धेच्या ठिकाणाऐवजी) त्यापुढील रेल्वे स्टेशनापर्यंत (जेथे स्टेशन कोटा जास्त असेल तोपर्यंत) प्रवास तिकीट काढण्याकरीता व प्रवास करण्याची विद्यापीठ संघांना परवानगी देण्यात येईल.

२. संघाबरोबर जाणारा संघव्यवस्थापक आणि प्रशिक्षक यांनीही आपल्या संघाबरोबर त्याच वर्गाने प्रवास केला पाहिजे त्यांना विद्यापीठ नियमानूसार प्रवासभत्ता, दैनंदिन भत्ता, आहार भत्ता, निवास भत्ता व स्थानिक भत्ता देण्यात येईल. संघव्यवस्थापक आणि प्रशिक्षक अशावेळी विद्यापीठ कार्यसेवेत आहेत असे समजण्यात येईल.

३. पुरुष व महिला सांघिक वा वैयक्तिक संघाबरोबर पाठविण्यात येणाऱ्या संघव्यवस्थापक, मार्गदर्शक, सहाय्यक व्यवस्थापक (केअर टेकर), विद्यापीठ कर्मचारी व बॅगेज्मन (शिपाई) विद्यापीठ कार्यसेवेत आहे असे समजले जाईल.

४. आंतर विद्यापीठ सामन्यांच्या जागी व प्रवासामध्ये असताना प्रत्येक खेळाडू, संघव्यवस्थापक, मार्गदर्शक, विद्यापीठ कर्मचारी, सहाय्यक व्यवस्थापक (केअर टेकर) व बॅगेज्मन (शिपाई) यांना विद्यापीठ नियमांनुसार प्रवासभत्ता, दैनंदिन भत्ता, आहार भत्ता, निवास भत्ता व स्थानिक भत्ता वेळोवेळी विद्यापीठाने ठरवून दिलेल्या नियमानूसार दिला जाईल.

५. याशिवाय हमाली, औषधोपचार वगैरे अनुषंगिक खर्चाकरीता संघव्यवस्थापकाला आवश्यकतेनुसार अग्रिम रक्कम/खर्च देण्यात येईल.

६. मात्र निवासाची जागा सामन्याच्या जागेपासून दूरवर केली असल्यास किंवा पर्यायी निवासव्यवस्था केल्यास किंवा निकडीच्या प्रसंगात जर संघव्यवस्थापकाला जादा खर्च करावा लागला तर संयोजन समितीचे लेखी पत्र (Distance Certificate & Reliving Certificate) सादर करावे तरच हा खर्च मंजूर करण्यासंबंधी विचार केला जाईल.

७. विद्यापीठ क्रीडा मंडळाचे संचालक किंवा संघव्यवस्थापक यापैकी कोणालाही विजेत्या संघाचा फोटो घेण्याची व्यवस्था करता येईल. मात्र, जर संघाने विजेतेपद प्राप्त केलेले असेल तर आणि केवळ पहिल्या तीनच प्रतींचा खर्च विद्यापीठातर्फे केला जाईल.

८. उपरिनिर्दिष्ट मर्यादेपलीकडे विशेष परिस्थितीत संघव्यवस्थापकाला खर्च करावा लागल्यास, त्याची योग्य योग्यता ठरवून तो मंजूर करण्याविषयीचा निर्णय मा. संचालक, विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण, मुंबई विद्यापीठ यांचे अखत्यारीत राहिल.

९. विद्यापीठ संघाच्या सरावासाठी येणाऱ्या स्थानिक (मुंबई शहर व उपनगर मधील) व बाहेरील (मुंबई शहर व उपनगर व्यतिरीक्त)येथील खेळाडू जर मार्गदर्शकाने वा विद्यापीठाने जाहिर केलेल्या/सांगितलेल्या सरावशिबीरात हजर राहिल्यास त्या खेळाडूंना सराव भत्ता (Camp Allowance) विद्यापीठ नियमानूसार देण्यात येईल.

१०. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेचे अनुदान, निवड समितीचे मानधन, संघव्यवस्थापक व मार्गदर्शकांचे दैनंदिन भत्ता व प्रवास भत्ता खेळाडूचा दैनंदिन भत्ता, आंतर विभागीय संघास टी–शर्टस्, इ. सर्व खर्च विद्यापीठाच्या समन्वयकांच्या हस्ते देण्यात येतील.

**यावरील नियमाप्रमाणे काही परिस्थितीनुरुप बदल करण्याचा अधिकार विद्यापीठ क्रीडा मंडळाने स्वतःकडे राखून ठेवलेले आहेत.**

## १०. विद्यापीठ संघनिवड सदस्यासंबंधी/निवड समिती सदस्यांसाठी विशेष नियमावलीः–

१. आंतर विभागीय/निवड चाचणी स्पर्धेतून गुणवत्तेनुसार संबंधित खेळाडूंचा खेळ पाहून स्थाननिहाय (पोझिक्षन–वाईज) विद्यापीठाचा संघ निवडण्यात यावा.

२. निवडलेल्या संघांची यादी बंद पाकिटात आंतर विभागीय स्पर्धेच्यावेळी उपस्थित असलेल्या विद्यापीठ क्रीडा मंडळाच्या प्रतिनिधीकडे देणे अथवा विद्यापीठ क्रीडा मंडळाचा प्रतिनिधी उपस्थित नसल्यास निवड समितीपैंकी एका सदस्याने स्वहस्ते मा. संचालक, विद्यापीठ क्रीडा मंडळाकडे सुपूर्त करावे.

३. निवड झालेल्या खेळाडूंची माहितीबाबत गोपनियता बाळगावी.

४. आंतर विभागीय स्पर्धेच्यावेळी निवड समितीच्या सदस्याने सर्व सामने पाहून विद्यापीठ संघांची निवड करावी.

५. आंतर विभागीय स्पर्धेत/निवड चाचणीस निवड समिती सदस्यांचे जर कोणी खेळाडू हा नातेवाईक असल्यास तेव्हा निवड समिती सदस्यांची जबाबदारी स्विकारु नये. (उदा. भाऊ, बहिण, चुलतभाऊ–बहिण, भावाची व बहिणीची मुले, तसेच पत्नीकडील नातेवाईक व इतर प्रकारचे जवळचे नातेवाईक)

६. आंतर विभागीय स्पर्धेच्यावेळी/निवड चाचणीच्यावेळी निवड समिती सदस्यांनी संघाच्या निवडीच्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रकारची जबाबदारी स्विकारु नये. (उदा. पंच म्हणून कामकरणे, ओळखीच्या खेळाडूंना अथवा संघांला मार्गदर्शन करणे, तसेच आलेल्या संघव्यवस्थापकांशी जवळीक साधणे, खेळाडूंच्या नातेवाईकांशी अथवा खेळाडूंच्या ओळखीनी असलेल्याशी जवळीक करणे, इ.)

७. आपण निवड समिती सदस्य आहात याची गोपनीयता बाळगणे.

८. आपणांस विद्यापीठाने दिलेल्या तारखा व वेळेनुसार स्पर्धास्थळी उपस्थित रहावे.

९. निवड समिती सदस्य म्हणून नियुक्त झाल्यानंतर संबंधित स्पर्धेच्या निवड समिती सदस्य म्हणून जबाबदारी स्विकारीत आहात किंवा नाही याविषयीची माहिती विद्यापीठ क्रीडा कार्यालयास त्वरीत कळविणे आवश्यक आहे.

१०. आंतर विभागीय स्पर्धेमध्ये सर्व खेळाडूंना खेळण्याची संधी दिली आहे का? किंवा संधी दिली नसल्यास अशा खेळाडूंची निवड चाचणी घेण्याचा अथवा न घेण्याचा सर्वस्वी अधिकार आपणांकडे राहिल.

११. विद्यापीठाने ठरवून दिलेल्या नियमांची पूर्तता करुनच एखादा खेळाडू हा विभागीय पातळीवर निवड चाचणीसाठी येवू शकतो. काही खेळाडू हे आंतर विभागीय स्पर्धेच्या वेळी इतर राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त स्पर्धेत सहभागी असतीलतर अशा खेळाडूंना विद्यापीठाच्या संघाच्या सराव शिबिरात बोलावले जाईल मात्र अशासंबंधित खेळाडूचा अर्ज मा. प्राचार्य – विभागीय सचिवांच्या सहीने स्पर्धेपूर्वी मा. संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण यांच्याकडे सादर करणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत सराव शिबीरांमध्ये निवडलेल्या खेळाडूंमधून किंवा निवड चाचणीसाठी अर्ज करुन आलेल्या खेळाडूमधूनच निवड करण्यात येईल.

१२. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेच्या वेळी जर एखादा खेळाडू राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय अधिकृत स्पर्धेस गेला असेल तर त्या खेळाडूचा अर्ज संबंधित महाविद्यालयातील प्राचार्यामार्फत विभागीय सचिवांकडे पाठवावा. सदर खेळाडू हा आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत भागघेतला नाही असा शेरा संबंधित सचिवाने द्यावा. सदरचा अर्ज मा. संचालक विद्यापीठ क्रीडा मंडळाकडे आंतर विभागीय स्पर्धेपूर्वी जमा करावा.

१३. विद्यापीठ क्रीडा मंडळाने नियुक्त केलेल्या निवडसमिती सदस्यांपैकी काही सदस्य निवडचाचणीकरीता क्रीडा मंडळास न कळविता अथवा पूर्वसुचना न देता स्पर्धेच्या वेळी अनुपस्थित राहिल्यास अशा सदस्यांना एक वर्षासाठी निवड समिती सदस्य म्हणून काम करता येणार नाही.

१४. विद्यापीठ संघात निवड झालेल्या कोणत्याही खेळाडूंनी मी पुढील स्पर्धेत खेळणार नाही अथवा आंतर विद्यापीठ विभागीय स्पर्धेत भाग घेईन किंवा घेणार नाही. तसेच अखिल भारतीय स्पर्धेत खेळेन वा खेळणार नाही असे तोंडी सांगितले अथवा लेखी कळविले असले तरी त्या खेळाडूंचा विद्यापीठ संघ निवडीकरीता विचार करण्यात यावा.

## ११. विद्यापीठ क्रीडा मंडळाने नियुक्त केलेले निवड समिती सदस्य स्पर्धेस अनुपस्थित राहिल्यास:–

आंतर विभागीय स्पर्धेच्यावेळी होणाऱ्या स्पर्धा/निवड चाचणीच्यावेळी काही अपरिहार्य कारणास्तव: विद्यापीठ क्रीडा मंडळाने नियुक्त केलेले एक किंवा एकाहून अधिक निवड समिती सदस्य अनुपस्थित राहिल्यास अशावेळी स्पर्धेच्या अथवा निवड चाचणीच्या ठिकाणी जे विद्यापीठ प्रतिनिधी उपस्थित असतील त्यांनी संबंधित खेळांच्या स्पर्धेच्या ठिकाणी उपस्थित असलेले शारीरिक शिक्षण संचालक, इतर प्राध्यापक (संबंधित खेळाचे तज्ञ असलेले) अथवा खेळातील तज्ञ यांची नियुक्ती करुन संघ निवडीची प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल व अशा रितीने निवड झालेल्या विद्यापीठ संघांची अंतिम निवड मा. संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण मुंबई विद्यापीठ, मुंबई यांच्याकडून योग्यत्या मार्गदर्शनाने होईल.

## १२. विद्यापीठ संघाच्या संघनायकाच्या निवडीबाबत:–

१. मुंबई विद्यापीठातीलएका खेळासाठी एका खेळाडूस संघनायक म्हणून केवळ दोन संधी मिळतील.

२. संघनायक/कर्णधारपद निवडण्यासाठी खालील बाबींचा विचार केला जाईल.

१) आंतर विद्यापीठ स्पर्धेत त्या खेळातील खेळलेल्या वर्षांची संख्या,

२) वरील संख्या समान असल्यास प्रथम विद्यापीठ खेळलेल्या खेळाडूची संघनायक म्हणून निवड करताना ज्येष्ठ खेळाडूंची निवड केली जाईल. (उदा. सन २०१४–१५ व २०१७–१८ यामधील २०१४–१५ या वर्षांत खेळलेल्या खेळाडूचीच कर्णधारपदी/संघनायकपदी निवड केली जाईल.)

३) प्रथम निवड समान असेल तर वरच्या वर्गात शिकत असलेला खेळाडू कर्णधार,

४) एकाच वर्गात शिकत असल्यास आंतर विभागीय स्पर्धेतील विजयी संघातील खेळाडूस कर्णधारपद द्यावे,

५) वरील बाबींमध्ये समानता असल्यास कर्णधारपदी राष्ट्रीय पातळीवर खेळाचा अनुभव असलेल्या खेळाडुचा विचार करावा,

६) जर त्यामध्येही साम्यता असेल तर त्या खेळाडूंमधील खेळातील कौशल्यावर कर्णधारपदठरविण्यात येईल

३. आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी निवड केलेल्या संघातील प्रत्यक्ष मैदानावर खेळणाऱ्या खेळाडूंची नावे, मार्गदर्शक आणि संघनायकाने विचारविनिमय करुन प्रतिस्पर्धी संघ पाहून निर्णय घ्यावा. मात्र अशावेळी मार्गदर्शकाचा निर्णय हा अंतिम राहिल. ज्यास्पर्धेसाठी मार्गदर्शक जाऊ शकणार नाही,अशावेळी संघव्यवस्थापक हाच मार्गदर्शक म्हणून कामे पाहिल.

## १३. विद्यापीठ संघात निवड होऊनही पूर्वसुचना न देता खेळाडू गैरहजर राहिल्यासः—

१. मुंबई विद्यापीठाचा संघ जाहिर झाल्यानंतर एखादा खेळाडू आंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभागी होणार नसल्यास अशा खेळाडूंना **आठ दिवसांच्या** आत अथवा सराव शिबिर सुरु होण्यापूर्वी आपल्या महाविद्यालयाच्याा प्राचार्य मार्फत लेखी स्वरुपात आंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभागी होता येणार नाही यासंबंधीचे पत्र विद्यापीठ क्रीडा कार्यालयास पाठविणे आवश्यक आहे.

२. एखाद्या खेळाडूने पूर्वलेखी सुचना न देता गैरहजर राहिल्यासअशा खेळाडूंस पुढील शैक्षणिक वर्षाकरीताआंतरमहाविद्यालयीन, आंतर विभागीय आणि आंतर विद्यापीठ स्पर्धेकरीता बंदी घालण्यात येईल.

३. पश्चिम विभागीय स्पर्धेतून पात्र व अखिल भारतीय स्पर्धेत पात्र झालेल्या खेळाडूंना अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभागी होणे बंधनकारक राहिल. अन्यथा पुढील वर्षी अशा खेळाडूंना आंतरमहाविद्यालयीन, आंतर विभागीय आणि आंतर विद्यापीठ स्पर्धेकरीता पुढील वर्षी बंदी घालण्यात येईल.

## १४. विद्यापीठ संघाच्या निवडीसंबंधी नियमः—

१. बॅडमिंटन, टेबलटेनिस, टेनिस, बुद्धीबळ, स्क्वॉश रॅकेट्स, धर्नुविद्या (आर्चरी), ॲथलेटिक्स, क्रॉसकंट्री, जिम्नॅस्टिक, मल्लखांब, वजन उचलणे, शुटिंग, ज्युडो, कुस्ती, इ. वैयक्तिक क्रीडा प्रकारामध्ये येतात. परंतू हे सर्व क्रीडा प्रकार सांघिक म्हणून स्पर्धेत खेळविले जातात. खेळातील गरजेनुसार व स्थानांनुसार/क्रमांकानुसार, खेळातील संख्येनुसार संघाची निवड केली जाईल. त्या सदर नियमांनुसार आंतरमहाविद्यालयीन, आंतर विभागीय व आंतर विद्यापीठीय स्पर्धा खेळविल्या जातील. तसेच आंतर विभागीय वैयक्तिक स्पर्धा ह्या बाद पध्द्तीने घेतल्या जातील.

२. सांघिक क्रीडा खेळातील आंतर विभागीय पातळीवर विजयी होणाऱ्या संघातील कमीतकमी ४०% खेळाडू हे विद्यापीठ संघात राहतील.

३. एखादया विभागाचा खेळाडू हा निवड चाचणीमध्ये असेल तर तो ४०% धरता येईल.

४. आंतर विभागीय वैयक्तिक क्रीडा स्पर्धेत आपल्या विभागाचे सिडींग/क्रमवारीनुसार संघाची यादी विद्यापीठाकडे जमा करावी.

५. एखादा खेळाडू हा आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत सहभाग घेतला नसल्यास अशा खेळाडूस कोणत्याही स्पर्धेत अथवा निवड चाचणीत भाग घेता येणार नाही.

६. आंतर विभागीय निवड चाचणी स्पर्धेतून गुणवत्तेनुसार संबंधित खेळातील खेळ पाहून खेळातील स्थाननिहाय/पोझिशन—वाईज संघाची निवड केली जाईलव निवडीकरीता आलेला खेळाडू हा शालेय स्पर्धा (वय— १९ वर्ष) गटांतील व कनिष्ठ/वरिष्ठ आंतर महाविद्यालयीन स्पर्धा खेळलेला पाहिजे.

७. विभागीय स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना सर्व साखळी सामन्यांमध्ये उपस्थित राहणे आवश्यक आहे. जर एखादा खेळाडू सर्व सामन्यांमध्ये उपस्थित नसेल तर त्या खेळाडूचा विद्यापीठ संघात निवडीसाठी विचार होणार नाही. त्याचप्रमाणे काही परीस्थितीमध्ये विद्यापीठ व संघव्यवस्थापक खेळाडूंना परवानगी देण्यात येईल.

८. एखादा खेळाडू आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेच्या वेळी इतर अधिकृत राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी झाला असेल तर अशा खेळाडूंच्या निवडचाचणीचे पत्र मा. प्राचार्य — सचिवामार्फत क्रीडा विभागाकडे विभागीय स्पर्धेपूर्वी जमा करणे आवश्यक आहे. अथवा काही खेळाडू हे आंतर विभागीय स्पर्धेच्या वेळी इतर राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त स्पर्धेत खेळत असतील तर अशा खेळाडूंना विद्यापीठाच्या संघाच्या सराव शिबीरात बोलविले जाईल. संबंधित खेळाडूचा अर्ज प्राचार्य — विभागीय सचिवांच्या सहीने स्पर्धेपूर्वी मा. संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण यांच्याकडे सादर करणे आवश्यक आहे. सराव शिबीरामध्ये संघ निवडण्यात येईल.
जर खेळाडू आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेच्या वेळी राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय अधिकृत स्पर्धेत सहभाग घेतला असेल तर त्या खेळाडूचा अर्ज संबंधित महाविद्यालयातील मा. प्राचार्यामार्फत विभागीय सचिवांनी खेळाडू आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत सहभागी झाला नाही असा शेरा द्यावा. सदरचा अर्ज मा. संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण यांच्याकडे जमा करावे, अशा खेळाडूंची निवड चाचणी आंतर विभागीय स्पर्धेतच होईल.

९. आंतरमहाविद्यालय अथवा आंतर विभागीय स्पर्धा ह्या अडीअडचणींच्या परिस्थीतीमध्ये अशक्य असल्यास विद्यापीठाचा संघ हा निवड चाचणीकडून निवडण्यात येईल. या निवड चाचणीमध्ये राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, विद्यापीठ खेळाडू यांनाच संधी देण्यात येईल.

.............................................................................

**UNIVERSITY OF MUMBAI**
**(University Board of Sports & Physical Education)**
**$3^{rd}$ Sports Seminar & Workshop of Universities Affiliated Colleges Sports Directors for the year 2024-25**
**Host by, Sterling College of Arts, Commerce & Science, Nerul**
**Held at - Dream Resort Lonavala, Near Don Bosco School, Tungarli, Lonavala – 410 502**
**From – Monday $17^{th}$ June, 2024 To Thursday $20^{th}$ June, 2024**

# -: REGISTRATION FORM :-

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **1)** | **Name of the Phy. Edun. & Sports Director/ Sports Teacher /Sports Head of the College :** | | | | |
| **2)** | **Designation :** (Please Tick ✓ which is applicable) | **(A)** | **The Director of Physical Education and Sports (Approved)** | | |
| | | **(B)** | **Sr. College Sports Teacher (Having M.P.Ed. Degree) but not Approved by University.** | | |
| | | **(C)** | **Jr. College Sports Teacher (Having M.P.Ed. Degree) but additional working for Sr. College Sports.** | | |
| | | **(D)** | **Sports In-Charge/Head but approved other Subject faculties.** | | |
| **3)** | **Mobile No.:_________________** | **4) Add. Mobile No.:___________________ (if any)** | | | |
| **5)** | **Date of Birth : _____________** | **6) E-mail ID:_____________________** | | **7) Blood Group: ___** | |
| **8)** | **Educational Qualification :** | | | | |
| **9)** | **Select Zone :** (Please Tick ✓ which is applicable) | **I** | **Mumbai City Zone** | **II** | **Mumbai Suburban Zone** |
| | | **III** | **Thane Zone** | **IV** | **Konkan Zone** |
| **10)** | **Name of the College with Complete Postal Address :** | | | | |
| **11)** | **Name of the College Principal :** | | | | |
| **12)** | **Mobile No.:_________________** | **13) Add. Mobile No.:___________________ (if any)** | | | |
| **14)** | **College Contact No.:______________________** | **15) College E-mail ID: _______________________** | | | |

**Note: Kindly attach the College Relieving Letter with Registration Form are compulsory.**

**Date : ____________**

**Signature of Participants**